
दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २५४ I शनिवार २७ जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू
लई भारी ! १ नंबर
परिमल भारतवासी

तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी निळकंठ,
शुभलाभ १२० ग्रॅम ६इन१ पाऊच रु. ५०मध्ये
अगरबत्ती चे जिल्हा वितरक व कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.

## महत्त्वाचे..



### प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब पाजावेत

**मुंबई :** राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून पोलिओमुक्त महाराष्ट्राचा दर्जा कायम राखण्यासाठी सर्व पालकांनी रविवार, २८ जून २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले आहे. या मोहिमेसाठी राज्यभरात ८९,४८९ लसीकरण बुथ, २६,५३० ट्रान्झिट पथके, १३,५१८ मोबाईल पथके आणि ५८६ रात्रपाळी पथके कार्यरत राहणार आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात रविवार, २८ जून २०२६ रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण म ोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ कोटी ३ लाख बालकांना सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत पोलिओ प्रतिबंधक बायव्हॅलेंट ओरल पोलिओ व्हॅक्सीनचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत.

# मोदी मंत्रिमंडळात फेरबदल..?

## रविवार किंवा सोमवारी विस्ताराची शक्यता : शक्तिकांत दास, श्रीकांत शिंदे, अरुण गोविल यांची नावे चर्चेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या मंत्रिमंडळात मोठ्या फेरबदलाची जोरदार चर्चा सुरू असून, पुढील दोन-तीन दिवसांत म्हणजे रविवार किंवा सोमवारी मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्वतंत्रपणे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर या चर्चेला अधिक वेग आला आहे. मात्र, याबाबत केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

या संभाव्य फेरबदलात महाराष्ट्राला विशेष महत्त्व मिळण्याची शक्यता व्यक्त होत असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि



कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. उद्धव ठाकरे गटातील सहा खासदारांना शिंदे गटात आणण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा असून, त्याची राजकीय दखल घेत त्यांना केंद्रीय कॅबिनेटम ध्ये स्थान मिळू शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. महाराष्ट्रातील शिवसेनेची वाढती ताकद, एनडीएमध्ये शिंदे गटाचे वाढलेले संख्याबळ आणि आगामी राज्यांच्या निवडणुकांची रणनीती लक्षात घेता महाराष्ट्राला अतिरिक्त प्रतिनिधित्व देण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तृणमूल

### चर्चेतील संभाव्य नावे

- डॉ. श्रीकांत शिंदे (महाराष्ट्र)
- शक्तिकांत दास
- अनुराग ठाकूर
- अरुण गोविल
- नितीश कुमार
- विष्णुदत्त शर्मा
- तरुण चुग
- जनार्दन सिंह सिग्रीवाल

कॉंग्रेसमधील बंडखोर खासदारांपैकीही एक-दोन जणांना मंत्रिपद मिळू शकते, अशीही चर्चा आहे.

सध्या समोर येत असलेली यादी आणि नावे ही राजकीय सूत्रांवर आधारित असून, केंद्र सरकारने याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. त्यामुळे अंतिम निर्णय राष्ट्रपती भवनातून जाहीर होणाऱ्या अधिकृत यादीतूनच स्पष्ट होणार आहे. मात्र, संभाव्य फेरबदलाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होत असून,





मोदी सरकारच्या नव्या मंत्रिमंडळात महाराष्ट्राला किती प्रतिनिधित्व मिळणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### शक्तिकांत दास अर्थमंत्री?

या फेरबदलात सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर आणि सध्या पंतप्रधानांचे प्रधान सचिव शक्तिकांत दास. त्यांना केंद्रीय अर्थमंत्रीपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते, तर विद्यमान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची धुरा सोपवली जाऊ शकते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे.

### खात्यांमध्ये मोठे बदल?

सूत्रांच्या माहितीनुसार, काही महत्त्वाच्या मंत्रालयांमध्येही फेरबदल होऊ शकतो. अर्थ, शिक्षण, ऊर्जा आणि शहरी विकास या खात्यांम ध्ये बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### धर्मेंद्र प्रधान यांच्यावर टांगती तलवार

नीट परीक्षेतील वादाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव बदलाच्या चर्चेत आहे. त्याचप्रमाणे हरदीप सिंह पुरी, रवनीत सिंह बिट्टू आणि काही राज्यमंत्र्यांनाही मंत्रिमंडळाबाहेर जावे लागू शकते, अशी राजकीय चर्चा सुरू आहे.

# अनधिकृत जैविक औषधांची विक्री केल्यास कृषी केंद्रांवर होणार कायदेशीर कारवाई

## कृषी विभागाचा सज्जड इशारा: 'खत नियंत्रण आदेश १९८५' अन्वये होणार गुन्हे दाखल करणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी विक्रीसाठी अधिकृत परवाना नसलेल्या कोणत्याही जैविक औषधांची विक्री करू नये, असे कडक आदेश श्रीरामपूरचे तालुका कृषी अधिकारी आणि गुणनियंत्रण विभागाने जारी केले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करून अनधिकृत किंवा बंदी असलेल्या जैविक औषधांची साठवणूक अथवा विक्री केल्यास, संबंधित विक्रेत्याविरुद्ध 'खत नियंत्रण आदेश १९८५' अन्वये कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा कृषी विभागाने दिला.

या संदर्भात श्रीरामपूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून 'कृषी निविष्ठा




विक्रेते असोसिएशन' आणि तालुक्यातील सर्व अधिकृत कृषी सेवा केंद्र चालकांना लेखी पत्र पाठवून याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.जैविक औषधे आता 'खत नियंत्रण आदेशा'च्या कक्षेत असून शासनाच्या नवीन नियमानुसार, प्रचलित वापरामध्ये असलेली सर्व जैविक औषधे ही १७ जून २०२५ नंतर (पान ४ वर)

### कृषी विभागाच्या दिरंगाईमुळे ९०० कोटीची ऊलाढाल...

**शासनाने बंदी घातलेल्या ९०० कंपन्यांची कृषी विभागाचे संगनमताने ९०० नगर जिल्ह्यात श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, राहता, कोपरगाव, संगमनेर, तालुक्यात सर्रास विक्री वर्षभरात ९०० कोटींच्या ऊलाढालीची शक्यता नाकारता येत नाही. गेल्या सात महिन्यांपासूनचे पाठपुराव्यानंतर आपणास शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यात यश येत आहे. या रॅकेटमध्ये राज्यापासून ते खालपर्यंतची साखळी उघड होणार असल्याचे प्रतिपादन अँड. अजित काळे म्हणाले.**

# राम मंदिराच्या कोट्यवधींच्या देणगीत डल्ला?

### चंपत राय, अनिल मिश्रा यांचा ट्रस्टमधून राजीनामा

**अयोध्या :** अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या देणगीतील कथित अपहार प्रकरणाला मोठे वळण मिळाले असून, श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांनी आपल्या पदांचा राजीनामा दिला आहे. विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) प्राथमिक अहवालातील शिफारशींनंतर हा निर्णय झाल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणातील तपासाला आता अधिक गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एसआयटीच्या प्राथमिक अहवालाच्या आधारे यापूर्वीच राम जन्मभूमी पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध अपहार, फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आतापर्यंत चार आरोपींना अटक केली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे.

एफआयआरमध्ये रामशंकर यादव उर्फ टिन्नू, अनुकल्प मिश्रा, (पान ४ वर)

### डंपर ताब्यात, जमिनीवर डोळा...

# सावकारी जाचाला कंटाळून शेतकरी तरुणाची आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे २८ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची



धक्कादायक घटना घडली आहे. मृताच्या नातेवाईकांनी खाजगी सावकारांच्या सततच्या त्रासामुळे हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप केला असून, या घटनेमुळे देवळाली प्रवरा परिसरात संतापाचे वातावरण पसरले आहे.

देवळाली प्रवरा येथील गडाख वस्ती (खांदे वस्ती) येथील शुभम बाबासाहेब खांदे (वय २८) यांनी आज सकाळी राहत्या घरात साडीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. काही दिवसांपूर्वी त्यांच्या मालकीचा डंपर खाजगी सावकाराने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. तसेच पैसे भरा, अन्यथा तुमच्या नावावरील जमीन आमच्या नावावर करून द्या, असा सतत तगादा लावला जात असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. शुभम खांदे यांना तातडीने राहुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून आत्महत्येमागील कारणांचा तपास सुरू आहे.

शुभम खांदे हे शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि तीन वर्षांची मुलगी असा परिवार आहे. एकुलत्या एक मुलाच्या निधनाने खांदे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, या प्रकरणात खाजगी सावकारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत असून, पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अधिकारी बदलले; यंत्रणा कधी बदलणार..?

## कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी तक्रारी असलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई होणार का

**राष्ट्र सह्याद्री विशेष**

भाग एक

क्राईम फाईल: अहिल्यानगर
गुन्हा, तपास आणि न्यायव्यवस्थेचा सखोल वेध
संपादक : करण नवले

**अहिल्यानगर :** जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी जिल्ह्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर पोलिस यंत्रणेच्या कामकाजात हालचाल वाढलेली आहे. विविध ठिकाणी अवैध धंद्यांवर कारवाई, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष मोहीम आणि प्रशासनातील सक्रियता यामुळे जिल्ह्यातील पोलिस विभाग चर्चेत आला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी नुकताच घेतलेला एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे जिल्ह्यातील १९ पोलिस अधिकाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्या..!



या बदल्यांमध्ये पोलिस निरीक्षक आणि सहायक पोलिस निरीक्षक स्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील पोलिस यंत्रणेला नव्या पद्धतीने कार्यरत करण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. काही ठिकाणी दीर्घकाळ कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची बदली करून नव्या अधिकाऱ्यांना संधी देण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करणे आणि अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे बोलले जात आहे.

मात्र या निर्णयानंतर आता दुसरी चर्चा पुढे येऊ लागली आहे. केवळ वरिष्ठ अधिकारी बदलून अपेक्षित परिणाम मिळणार का? कारण प्रत्यक्षात पोलिस ठाण्यांच्या दैनंदिन कामकाजात अधिकारी जितके महत्त्वाचे असतात, तितकीच भूमिका त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची असते.

अनेकदा एखादा अधिकारी बदलतो, पण त्याच ठिकाणी दीर्घकाळ कार्यरत असलेली कर्मचारी यंत्रणा तशीच राहते. त्यामुळे कामकाजाच्या पद्धतीत फारसा बदल जाणवत नसल्याची भावना काही ठिकाणी व्यक्त केली जाते. अशा वेळी केवळ अधिकाऱ्यांचा खांदेपालट न करता संबंधित कर्मचाऱ्यांचाही आढावा घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. (पान ४ वर)

### पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडून नागरिकांच्या अपेक्षा

- तक्रारी असलेल्या कर्मचाऱ्यांचे पुनर्मूल्यांकन
- संवेदनशील ठिकाणी नव्या नियुक्त्या
- अवैध धंद्यांवर सातत्यपूर्ण कारवाई
- पोलिस ठाण्यांची कार्यपद्धती अधिक पारदर्शक करणे

# तुटलेल्या वीजतारेचा शॉक; वृद्धासह दोन शेळ्यांचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील बिलोणी शिवारातील गट क्रमांक १८८ मध्ये तुटलेल्या वीजतारेचा विजेचा धक्का लागून एका वृद्धाचा व दोन शेळ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. २६) सायंकाळी चार वाजेच्या सुमारास घडली आहे महावितरणच्या हलगर्जीपणामुळे हा बळी गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

मृत व्यक्तीचे नाव बाळू शंकर वाघ (वय ७१, रा. बिलोणी, ता. वैजापूर) असे आहे. ते शेतात शेळ्या चारत असताना जमिनीवर पडलेल्या तुटलेल्या वीजतारेचा अंदाज न आल्याने त्यांना विजेचा धक्का बसला. या घटनेत त्यांच्या दोन शेळ्यांचाही मृत्यू झाला.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, संबंधित वीजतार गेल्या तीन महिन्यांपासून तुटलेल्या अवस्थेत होती. याबाबत शेतकरी व नागरिकांनी म हावितरणकडे अनेकवेळा लेखी निवेदन तसेच तोंडी तक्रारी करूनही दुरुस्ती करण्यात आली नाही. परिणामी हा दुर्दैवी प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. बाळू वाघ यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. शिऊर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. पूढील तपास वैभव रणखांब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल किशोर आघाडे तपास करीत आहेत.

# सेवापूर्ती की राजकीय लॉँचिंग? कळमकरांच्या सत्कारातून रंगली नवी चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** –शिक्षक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेले डॉ. संजय कळमकर यांच्या सेवापूर्ती सत्कार सोहळ्याने केवळ एका शिक्षकाचा गौरव केला नाही, तर अहिल्यानगरच्या राजकीय वर्तुळात भविष्यातील नव्या समीकरणांची चर्चाही पेटवली. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून डॉ. कळमकर यांना आता सक्रिय राजकारणात या असे जाहीर आवाहन केल्याने या कार्यक्रमाला स्पष्ट राजकीय संदर्भ लाभल्याची चर्चा शिक्षक आणि राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

सामान्यतः सेवापूर्ती समारंभ हा व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित केला जातो. मात्र या कार्यक्रमात मंचावरील उपस्थिती, भाषणांचा सूर आणि विशेषतः विखे पाटील यांनी केलेले राजकीय आवाहन यामुळे हा कार्यक्रम आगामी राजकीय घडामोडींची नांदी ठरू शकतो, अशी चर्चा रंगली.

डॉ. संजय कळमकर यांनी जिल्हा शिक्षक बँकेच्या निवडणुकीत




सक्रिय सहभाग घेतला होता. त्या निवडणुकीत त्यांना सुमारे १८०० म तांचे समर्थन मिळाले होते. ही संख्या काहींना मर्यादित वाटत असली, तरी समर्थकांच्या मते त्या निवडणुकीने शिक्षक समाजातील त्यांचा स्वतंत्र प्रभाव सिद्ध केला. विरोधक मात्र एवढ्या मतांच्या आधारावर थेट विधान परिषदेसारख्या मोठ्या राजकीय व्यासपीठाची चर्चा करणे घाईचे असल्याचे सांगतात.

मात्र राजकीय विश्लेषक वेगळा मुद्दा मांडतात. जिल्हा बँक, सहकारी संस्था किंवा स्थानिक निवडणुका आणि पदवीधर अथवा शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुका यांचे स्वरूप पूर्णतः भिन्न असते. मतदारांचा वर्ग, अपेक्षा, प्रचाराची पद्धत आणि मतदानाचे निकष वेगळे असल्याने एका निवडणुकीचा निकाल दुसऱ्या निवडणुकीचा मापदंड ठरत नाही.

विशेष म्हणजे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघात उमेदवाराची प्रतिमा, बौद्धिक योगदान, शैक्षणिक कार्य, संघटन कौशल्य आणि सातत्यपूर्ण संपर्क यांना अधिक महत्त्व दिले जाते. या निकषांवर डॉ. कळमकर यांचे नाव भविष्यात चर्चेत राहू शकते, अशीही प्रतिक्रिया काही शिक्षकांनी व्यक्त केली. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या म ाजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांची उपस्थिती आणि विखे पाटील यांचे स्पष्ट राजकीय निमंत्रण यामुळे हा केवळ औपचारिक सत्कार नव्हता, असा संदेश अनेकांना मिळाल्याचे बोलले जात आहे. भविष्यातील शिक्षक मतदारसंघ किंवा पदवीधर मतदारसंघाच्या राजकारणात नवे चेहरे पुढे आणण्याच्या रणनीतीचा(पान ४ वर)

# भाजपमध्ये मराठा विरुद्ध ब्राह्मण वाद?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

### फडणवीसांसमोरच मेधा कुलकर्णी-अभिमन्यू पवार आमनेसामने



**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यात आयोजित मराठा समाजातील यूपीएससी व एम पीएससीमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात भाजपच्या राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी आणि औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांच्यातील वादामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. पहिल्या रांगेत बसण्याच्या म ुद्द्यावरून झालेल्या या वादाला मेधा कुलकर्णी यांनी जातीय रंग देण्यात आल्याचा आरोप केला.

मेधा कुलकर्णी यांनी दावा केला की, हा कार्यक्रम मराठा समाजाचा असल्याने तुम्ही पहिल्या रांगेत बसलात तर वाद होईल, असे अभिमन्यू पवार यांनी सांगितले. शासकीय कार्यक्रमात (पान ४ वर)

# प्रभू श्रीरामाच्या तिजोरीची अन् श्रद्धेचीही चोरी!




अयोध्येतील श्रीराम मंदिर हे केवळ दगड-मातीचे मंदिर नाही. कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धा, त्याग, संघर्ष आणि भावविश्वाचे ते सर्वोच्च प्रतीक आहे. शेकडो वर्षांच्या प्रतीक्षेनंतर उभे राहिलेले हे मंदिर देशाच्या सांस्कृतिक इतिहासातील अभिमानाचा क्षण ठरले. अशा मंदिरातील देणगीच्या पैशांच्या अपहाराचे आरोप समोर येणे ही केवळ आर्थिक अनियमितता नाही; तर ती भाविकांच्या श्रद्धेवर झालेली जखम आहे.

या प्रकरणात मंदिर ट्रस्टच्या तक्रारीनंतर एफआयआर दाखल करण्यात आला असून, देणगी मोजणीशी संबंधित काही कर्मचाऱ्यांसह एकूण आठ जणांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. एफआयआरमध्ये ज्या आठ जणांची नावे आहेत, ते देणगी मोजणी व व्यवस्थापनाशी संबंधित कर्मचारी किंवा संबंधित व्यक्ती असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यात अनुकल्प मिश्रा, लवकुश मिश्रा, अविनाश शुक्ला, रामशंकर मिश्रा, रामाशंकर यादव (टिन्नू), मनीष यादव, सुभाषचंद्र श्रीवास्तव आणि करुणेश पांडे यांचा समावेश आहे. ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय आणि विश्वस्त डॉ. अनिल मिश्रा यांची नावे चर्चेत आली आहेत, तसेच त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारत राजीनामा दिल्याचे वृत्त आहे.

या संदर्भातील सीसीटीव्ही फुटेज, प्राथमिक चौकशी आणि विशेष तपासाच्या आधारे कारवाई सुरू असल्याचे वृत्त आहे. अंतिम सत्य न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल; परंतु एवढे मात्र निश्चित की, अशा स्वरूपाच्या आरोपांनी देशभरातील भाविकांना अस्वस्थ केले आहे.

देवस्थानांमध्ये भक्त देणगी देतात ती कोणत्याही व्यवहारासाठी नव्हे. ती श्रद्धेची अभिव्यक्ती असते. आपल्या कष्टाच्या कमाईतील काही हिस्सा प्रभूच्या चरणी अर्पण करताना भक्ताला विश्वास असतो की, हा पैसा धर्मकार्य, समाजोपयोगी उपक्रम आणि मंदिर व्यवस्थापनासाठीप्रामाणिकपणे वापरला जाईल. त्या विश्वासालाच जर तडा गेला, तर नुकसान केवळ आर्थिक राहत नाही; श्रद्धेचा पाया हादरतो.

रामाचे नाव भारतीय समाजात सत्य, न्याय, मर्यादा आणि आदर्श शासनाचे प्रतीक मानले जाते. अशा रामाच्या मंदिरातच आर्थिक अपहाराचे आरोप होणे ही अत्यंत वेदनादायी बाब आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे पक्षीय राजकारणाच्या चष्म्यातून न पाहता, संस्थात्मक उत्तरदायित्वाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.

या घटनेनंतर दोन टोकाच्या भूमिका दिसून आल्या. एकीकडे सरकार आणि संबंधित यंत्रणांनी चौकशी सुरू केली, तर दुसरीकडे विरोधकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकार आहे आणि निष्पक्ष चौकशी करणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु या वादात सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे भाविकांचा विश्वास हरवू नये.

देशातील मोठ्या देवस्थानांमध्ये आज कोट्यवधी रुपयांच्या देणग्या जमा होतात. त्यामुळे आधुनिक आर्थिक व्यवस्थापन, बहुस्तरीय लेखापरीक्षण, डिजिटल नोंदी, उच्च दर्जाची सीसीटीव्ही यंत्रणा, स्वतंत्र अंतर्गत तपासणी आणि नियमित सार्वजनिक अहवाल ही काळाची गरज बनली आहे. श्रद्धा जितकी मोठी, तितकी पारदर्शकतेची जबाबदारीही मोठी असली पाहिजे.

या प्रकरणातून आणखी एक धडा मिळतो. कोणतीही धार्मिक संस्था कायद्यापेक्षा मोठी असू शकत नाही. आरोप जर खरे ठरले, तर दोषी कोणत्याही पदावर असोत, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. कारण एका व्यक्तीच्या लोभामुळे संपूर्ण संस्थेची प्रतिमा मलिन होऊ नये.

राम मंदिर हे राष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. त्यामुळे या मंदिरावरील विश्वास अबाधित ठेवणे ही ट्रस्ट, प्रशासन आणि सरकार या तिन्हींची संयुक्त जबाबदारी आहे. चौकशी जलद, निष्पक्ष आणि पारदर्शक झाली, तर अफवांनाही आळा बसेल आणि भाविकांचाही विश्वास अधिक दृढ होईल.

आज गरज आहे ती आरोपांचे राजकारण करण्याची नाही, तर सत्य बाहेर आणण्याची. कारण रामाचे नाव घेणाऱ्या प्रत्येक संस्थेने रामाच्या आदर्शांचे पालन केले पाहिजे. प्रामाणिकपणा, मर्यादा आणि न्याय हीच रामराज्याची खरी ओळख आहे.

राम मंदिरातील कथित चोरी ही काही रुपयांची किंवा काही कोटींची बाब म्हणून विसरून चालणार नाही. हा प्रश्न भाविकांच्या विश्वासाचा आहे. मंदिरातील दानपेटीत भक्त पैसे टाकतो, तेव्हा तो नोटा देत नाही; तो आपली श्रद्धा अर्पण करतो. त्या श्रद्धेचे रक्षण करणे हीच खरी सेवा आहे. श्रद्धेच्या या पवित्र ठेव्यावर डल्ला मारणाऱ्यांना कायद्याची कठोर शिक्षा झाली, तरच भविष्यात अशा घटना रोखता येतील आणि रामभक्तांचा विश्वास पुन्हा दृढ होईल.

# समर्थ एकल भवनासाठी निश्चित प्रयत्न करू : आ. डॉ. किरण लहामटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अकोले ;** तालुक्यातील सुमारे साडेअकरा हजार एकल महिलांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असून त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी दरवर्षी 'एकल सभा' आयोजित करण्यात येईल. तसेच समर्थ संस्था आणि एकल हक्क संरक्षण समितीने मांडलेल्या 'समर्थ एकल भवन' या संकल्पनेसाठी निश्चित प्रयत्न करून सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही आमदार डॉ. किरण लहामटे यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त समर्थ संस्था अंतर्गत 'रविवारची शाळा'च्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी एकल महिलांच्या मुलांसाठी 'शिक्षण सेतू' उपक्रमांतर्गत ७५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्यात आले. तसेच एकल महिला हक्क संरक्षण समितीची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभात डेअरीचे संस्थापक किशोर निर्मळ होते.

यावेळी आ. लहामटे म्हणाले, समाजातील वंचित घटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे समर्थ संस्थेचे कार्य प्रेरणादायी आहे. शाहू, फुले, आंबेडकर आणि राघोजी भांगरे यांच्या विचारांवर चालणाऱ्या महाराष्ट्रात समाजकारणाची ही परंपरा जपणे ही सर्वांची जबाबदारी आहे. एकल महिलांवर अन्याय होऊ देणार नाही, त्यांच्या प्रश्नांसाठी आपण नेहमी एक पाऊल पुढे राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

किशोर निर्मळ यांनी समर्थ संस्थेचा 'अकोले पॅटर्न' इतर तालुक्यांसाठीही प्रेरणादायी ठरत असल्याचे सांगितले. शिक्षणामुळे वंचित समाज मुख्य प्रवाहात येतो, त्यामुळे हा उपक्रम कायमस्वरूपी सुरू राहण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू फिजा सय्यद, गिरिजा पिचड, प्रा. बाळासाहेब मेहेत्रे यांचीही मनोगते झाली. 'रविवारची शाळा'च्या वर्षभरातील उपक्रमांच्या अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विविध दानशूर व्यक्तींनी शैक्षणिक साहित्य, दप्तर, पुस्तके आणि आर्थिक मदतीचे योगदान दिले.

**'दारूचा परवाना' सरकारला परत करून व्यसनमुक्तीचा संदेश**

पतीच्या निधनानंतर आर्थिक अडचणी असूनही कोट्यवधी रुपयांच्या ऑफर नाकारत देशी दारू विक्रीचा परवाना सरकारकडे परत करून व्यसनमुक्त समाजासाठी आदर्श निर्माण करणाऱ्या रूपाली गुजर यांचा एकल महिला दिनानिमित्त विशेष मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

**प्रेरणादायी एकल महिलांचा सन्मान**

स्वतःच्या संघर्षातून कुटुंब सावरत मुलांचे शिक्षण पूर्ण करून इतर महिलांसाठी प्रेरणास्थान ठरलेल्या ज्योत्स्ना अमोल देशमुख, जयश्री दिनेश देशमुख, पूजा विवेक मालुंजकर आणि सोनाली उत्तम घोडके यांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

**२५ हजार वह्यांचे दान**

आमदार डॉ. किरण लहामटे यांनी एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी २५ हजार वह्यांचे दान दिले. तसेच ७५० विद्यार्थ्यांना दप्तर, नववी-दहावीच्या विद्यार्थ्यांना पुस्तके आणि अन्य शैक्षणिक साहित्य विविध दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने वितरित करण्यात आले.




# 'प्रतिभाताई पवार कॉलेज ऑफ फार्मसी'चा निकाल १०० टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर:** तालुक्यातील वडाळा महादेव येथील शिवा ट्रस्ट संचलित, 'प्रतिभाताई पवार कॉलेज ऑफ फार्मसी'चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. महाविद्यालयाने आपली दैदिप्यमान परंपरा कायम राखत यावर्षीही १०० टक्के निकालाची नोंद केली आहे.

औषधनिर्माणशास्त्र पदविका परिक्षेत प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी परीक्षेत या मोठे घवघवीत यश संपादन केले आहे.प्रथम वर्षातील विद्यार्थी हिने प्रथम क्रमांक पूर्वा विलास मोरे (७७.९०% द्वितीय क्रमांक सुदिपा बिस्वास (७७.४० % तृतीय क्रमांक राजश्री किशोर भालदंड (७६.५०%) तसेच द्वितीय वर्षात प्रथम क्रमांक माधुरी संदीप कर्डिले (८१.९१% द्वितीय क्रमांक सोनाली बबन पऱ्हाड (८१.८२ % तृतीय क्रमांक निकिता राजेंद्र सापते (८१.५५%) या विद्यार्थ्यानी यश संपादन केले. या विद्यार्थ्यांच्या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पवार, संचालक दिलीपराव पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार, प्राचार्य पल्लवी जाधव यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि वडाळा महादेव ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन केले असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# निळवंड्यांचे पाणी आल्याने जिरायत भागाला नवी संजीवनी : शालिनीताई विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** निळवंडे धरणाचे पाणी जिरायत भागात पोहोचल्याने शेतीला नवी संजीवनी मिळाली असून शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादनवाढीबरोबरच विक्री तंत्रज्ञानही आत्मसात करावे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकारच्या तेलबिया प्रात्यक्षिक प्रकल्पांतर्गत सोयाबीन बियाणे वितरण कार्यक्रमात सौ.विखे पाटील बोलत होत्या.

यावेळी केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. विलास घुले, डॉ. विठ्ठल विखे, सज्जला लांडगे, डॉ. प्रियंका खर्डे, कैलास लोंढे यांच्यासह संगमनेर, राहाता आणि राहुरी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विखे म्हणाल्या, ''जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नियोजनातून भंडारदरा आणि निळवंडे धरणाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन झाल्यामुळे या भागाला दुष्काळ व पाणीटंचाईची झळ बसली नाही. आगामी काळातही शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध



करून देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत.''

या पुढे म्हणाल्या, ''उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करून शेतकऱ्यांनी खरीप पिकांसह ऊस लागवडीकडेही लक्ष द्यावे. सोयाबीनची उत्पादकता वाढविण्यासाठी शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. उत्पादन वाढीसोबतच विक्री तंत्रज्ञानाची माहिती मिळाल्यास शेतकरी अधिक सक्षम आणि स्वयंपूर्ण होईल.''

देशाला खाद्यतेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'आत्मनिर्भर भारत' संकल्पनेला बळ देण्यासाठी तेलबिया उत्पादन वाढविणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविकात प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी सांगितले की, भारत सरकारच्या तेलबिया प्रात्यक्षिक प्रकल्पांतर्गत संगमनेर, राहाता आणि राहुरी तालुक्यातील पाच गावांतील १२५ शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा 'फुले द्रुवा' सोयाबीन वाण आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून एकरी उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. देश तेल उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावा या उद्देशाने हा प्रकल्प राबविला जातो या प्रकल्पाच्या माध्यमातून मिळालेल्या नवीन तंत्रज्ञानातून शेतकऱ्यांनी एकरी उत्पादन वाढवितांना या तंत्रज्ञानाचा प्रचार प्रसारही करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. प्रियंका खर्डे यांनी मानले.

# फुले माध्यमिक विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे लोककल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी एनसीसी अधिकारी संतोष जाधव यांनी प्रास्ताविक करून राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचा संक्षिप्त परिचय करून दिला. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन देत सामाजिक समता, जातिभेद निर्मूलन आणि गोरगरीब व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक लोकहितकारी योजना राबवल्या. ते पुरोगामी, विज्ञाननिष्ठ आणि समाजहिताची जाणीव असलेले दूरदृष्टीचे राज्यकर्ते होते. सर्वसामान्य जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहिरे ,उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा, प्रा. जितेंद्र मेटकर यांनी उपस्थित एनसीसी छात्राचे कौतुक केले.




# विद्यापीठ परिसरात दिव्यांग व्यक्तीला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**राहुरी :** कृषी विद्यापीठ परिसरात एका दिव्यांग व्यक्तीच्या घरात बेकायदेशीरपणे प्रवेश करून त्यांना व त्यांच्या आई-वडिलांना शिवीगाळ व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, फिर्यादी हे अंध व अपंग आहेत, हे माहीत असतानाही आरोपींनी हे कृत्य केले असुन एवढेच नव्हे तर, आरोपींनी घरातून मोबाईल चोरून नेला आणि त्या मोबाईलमधील फोन पे डरे फिर्यादीच्या बँक खात्यातून संमती शिवाय लबाडीच्या इराद्याने २२,४०२ रुपये स्वतःच्या बँक खात्यावर ट्रान्सफर करून आर्थिक फसवणूकही केली आहे. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार अरुणा हिवाळे, पुष्पा हिवाळे, विशाल हिवाळे, सर्व (श्रपरा. दुसरबीड, ता. सिंदखेड राजा, जि. बुलढाणा आणि अर्चना विष्णू भातसोड, रा. माळेगाव, ता. जि. जालना), अशा चार आरोपीं विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत ज्ञानदेव नामदेव गायकवाड (वय ४० वर्षे, रा. राहुरी कृषी विद्यापीठ, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना दि. १ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी यांच्या राहुरी विद्यापीठ येथील राहत्या घरी घडली. आरोपींनी फिर्यादीच्या घरात अनाधिकाराने प्रवेश केला आणि ''मुलगी माझ्या ताब्यात द्या'' असे म्हणून फिर्यादी तसेच त्यांच्या आई-वडिलांना शिवीगाळ व दमदाटी करण्यास सुरुवात केली. फिर्यादी हे अंध आणि अपंग आहेत, हे माहीत असूनही आरोपींनी त्यांना लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी घराच्या खिडकीत असलेला फिर्यादीचा मोबाईल चोरून नेला. त्या मोबाईलच्या फोन पे वरून २२ हजार ४०२ रुपये आरोपी अरुणा हिवाळे हिच्या खात्यावर ट्रान्सफर करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी फसवणूक केली. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक गणेश सानप हे करत आहेत.

# शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा;

## आ. लघेंच्या भूमिकेचे शेतकरी संघटनेकडून स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** शेतकरी जगाचा पोशिंदा आहे, मात्र, आज तोच आर्थिक संकटात सापडला आहे. उत्पादन खर्च आणि मिळणारा नफा यामध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. त्यामुळे केवळ कर्जमाफी नव्हे तर शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा करण्याची वेळ आली आहे, अशी भूमिका आ. विठ्ठलराव लंघे यांनी विधानसभेत मांडली. त्यांच्या या भूमिकेचे शेतकरी संघटनेने स्वागत केले आहे.



राज्याच्या पावसाळी अधिवेशन २०२६ मध्ये नेवासा मतदारसंघाचे आ. लंघे यांनी शेतकरी कर्जमाफी आणि कर्जमुक्तीचा मुद्दा अत्यंत भावनिक व ठामपणे उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नावर त्यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे तालुक्यातील शेतकरी संघटनांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, शेतकरी संघटनेच्यावतीने यापूर्वीच कर्जमाफीऐवजी कर्जमुक्ती आणि सातबारा कोरा या मागणीसाठी २९ मे रोजी नेवासा तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. त्या वेळी आमदार लंघे यांनी या मागणीचा विधानसभेत पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी अधिवेशनात हा प्रश्न ठामपणे मांडला. आमदार लंघे यांच्या या भूमिकेबद्दल शेतकरी संघटना व शेतकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे, प्रवक्ते कार्लस साठे, जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तूवर, तालुकाध्यक्ष अशोक काळे, युवा अध्यक्ष रोहित कुलकर्णी यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले. शेतकरी संघटनांच्या मते, सातबारा कोरा ही मागणी केवळ घोषणात्मक नसून ती शेतकऱ्यांच्या आर्थिक मुक्तीसाठी आवश्यक पाऊल आहे. त्यामुळे विधानसभेत हा मुद्दा ठामपणे मांडल्याने शेतकरी वर्गात अपेक्षा वाढल्या आहेत.

# झरेकाठी येथे एकल महिला दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी:** येथे एकल महिला दिन डॉ. सुजय राधाकृष्ण विखे प्रणित जनसेवा युवा मंच झरेकाठी व ग्रामपंचायत येथे जनसेवा युवा मंचचे सदस्य व ग्रामपंचायत सरपंच यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सोमनाथ डोळे यांनी एकल महिलांसाठी महात्मा ज्योतिबा फुले यांचे कार्य आणि त्यांच्या विचारधारेवर एकल महिलांना सन्मान आणि स्वयंरोजगार एकल महिलांच्या समस्या महिलांसाठी शासकीय योजना लाभ याबाबत मनोगत व्यक्त करताना एकल महिलांसाठी आलेल्या नवीन शासन धोरणाचे माहिती दिली गेली व महिलांना याबाबत मार्गदर्शन केले. एकल महिलांसाठी सर्वतोपरी योजनांचा लाभ मिळण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध होण्यासाठी जनसेवा युवा मंच उपक्रम राबवणार असल्याचे सांगितले. गावात १३० एकल महिला आहेत. या सर्व महिलांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनसेवा युवा मंच प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी ग्वाही दिली. जनसेवा युवा मंचचे सदस्य, सरपंच अशोक वाणी ग्राम विकास अधिकारी दत्तात्रय येळे,शांताराम ,चव्हाण पत्रकार सोमनाथ डोळे, , बचत गटातील महिला,आरोग्य सेविका, अंगणवाडी मदतनीस अंगणवाडी शिक्षिका, एकल महिला ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी पालखी सोहळ्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे : हभप देविदास महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींची कर्मभूमी असलेल्या नेवासे येथून निघणाऱ्या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पालखी दिंडी सोहळ्याच्या नियोजनासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीच्या वतीने मंदिर परिसरात आयोजित बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. पालखी सोहळा अधिक वैभवशाली करण्यासाठी सर्वांनी तन, मन आणि धनाने योगदान द्यावे, असे आवाहन संस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी केले.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री होते. प्रारंभी



संस्थानचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे स्वागत केले. विश्वस्त कृष्णाभाऊ पिसोटे यांनी पालखी सोहळ्याच्या नियोजनाची माहिती दिली.

यावेळी नेवासा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार, नंदकिशोर महाराज खरात, गहिनीनाथ महाराज आढाव, नंदकुमार पाटील, ॲड. संजय सुखदान, सतीश मुळे, अशोक डहाळे, सुधीर चव्हाण, स्वप्नील मापारी, हरि महाराज भोगे, मुरलीधर कराळे, मनोज पारखे आदींनी पालखी सोहळ्याच्या नियोजनाबाबत महत्त्वपूर्ण सूचना मांडल्या.

हभप देविदास महाराज म्हणाले, नेवासा हे संत ज्ञानेश्वर माऊलींचे पवित्र कर्मभूमी असून या क्षेत्राचा विकास व वैभव वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी येथे अडीच वर्षे वास्तव्य करून ज्ञानेश्वरीची निर्मिती केली, ही नेवासेकरांसाठी अभिमानाची बाब आहे. मंदिराचा विकास आणि तीर्थक्षेत्राची उंची वाढविण्यासाठी सर्वांच्या सहभागाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस विविध क्षेत्रांतील मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि नेवासेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# सावळीविहीर येथे छत्रपती शाहूमहाराज फलकाचे अनावरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू यांच्या जयंतीचे औचित्य साधून राहाता तालुक्यातील सावळीविहीर येथील नगरा ला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देवून येथील मा . ग्राम पंचायत सदस्य स्वप्नील पारडे यांनी एक आदर्श निर्माण केला आहे.

या फलकाचे अनावरण सावळी विहीर रुई रस्त्यावर करण्यात आले. प्रसंगी माजी सरपंच तथा राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब जपे, गणेश आगलावे, जिजाबा आगलावे, सुनिल जपे रावसाहेब एखंडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी स्वप्नील




पारडे म्हणाले की, आता पर्यत तालुक्यात सर्व महापुरुषांचे नावे प्रत्येक गावात दिसतात परंतू छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने कोणते नगर आढळून आले नाही. ज्या महापुरुषाने भारतात समानता आणण्यासाठी आरक्षण लागू करून या देशावर उपकार केले. त्यांची थोडी का होईना परतफेड म्हणून मी एक छोटासा प्रयत्न केला, असल्याचे त्यांनी सांगितले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### ना. राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त १०० किलो वह्यांचे वाटप



**झरेकाठी** : पाथरे बु. येथील श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना १०० किलो वह्यांचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर घोलप, विश्वास मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन १०० किलो वह्यांचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी स्थानिक स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष आबासाहेब घोलप, सुरेश घोलप, किशोर कडू, बादशाह घोणे, इंद्रभान कडू, सिराज पीर महंमद शेख, वसीम शेख उपस्थित होते. कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य बारगुजे , प्राध्यापक अनारसे पर्यवेक्षक तांबे, प्राध्यापिका संगीता गोर्डे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवा ट्रस्ट येथे जागतिक योग दिन उत्साहात

**श्रीरामपूर** : तालुक्यातीन वडाळा महादेव येथील शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, राष्ट्रीय सेवा योजना व कम्युनिटी मेडिसिन विभागा अंतर्गत संस्थेचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या योग प्रात्यक्षिकात सुमारे ४२० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या योग शिक्षिका डॉ. सुचिता भट्टड यांनी योगाविषयी माहिती दिली. श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिरचे संचालक संदीप कसार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर, शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुलाचे संचालक दिलीप पवार हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी श्रीकांत पवार, संदीप कसार, शिवा ट्रस्ट शैक्षणीक संकुलाचे संचालक दिलीप पवार यांनी योगाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. रिजवान अहमद, प्रा. पूनम बोधक, प्रा. पल्लवी जाधव, प्रा. प्रशांत वाघमारे, डॉ. हरिश्चंद्रे बापूसाहेब, डॉ. दर्शनी साबळे, डॉ. संगीता पागिरे, डॉ. अभय पानसंबळ, डॉ. अनिता आगळे, डॉ. भगीरथ जाधव, डॉ. विद्या दहे, डॉ. विपिन जेठलिया, डॉ. पौर्णिमा कळमकर, डॉ. विजय पवार, डॉ. प्रतिमा सोनवणे, डॉ. देवेंद्र जावळे, डॉ. विशाखा टेंभूर्णे, डॉ. रियाज पटेल, डॉ. रेखा नाईक, डॉ. सारिका घेरडे, डॉ. प्रदीप कळमकर, डॉ. महेजबीन शेख, डॉ. महेश कोकाटे, डॉ. मेमन मोहम्मद नाकीब अदम, डॉ. मुनज्जा शेख, डॉ. प्राची आंबेकर, डॉ. समर रणसिंग, डॉ. दीप्ती गाडेकर आदी उपस्थित होते.

### अर्चना कोठारी यांचे संथारात निधन



**श्रीरामपूर** : येथील वॉर्ड नं. ७, सरस्वती कॉलनी मध्ये वास्तव्यास असलेल्या ड. अर्चना गौतम कोठारी (वय ४४) यांचे शुक्रवारी, दि. २६ रोजी संथारा व्रतात महानिर्वाण झाले आहे. त्यांच्या पश्चात पती, दीर, भावजयी, पुतणे असा परिवार आहे. त्या कल्पेश (गौतम) कोठारी यांच्या पत्नी, सुवालाल, कांतीलाल, विजय, सुनील व स्व. मनसुख कोठारी यांच्या त्या सुन होत्या. तसेच रिचा कोठारी यांच्या त्या मातोश्री होत. ड. अर्चना कोठारी यांची अंतिम महानिर्वाण यात्रा शुक्रवारी दुपारी त्यांचे निवासस्थानापासून निघाली होती. अमरधाममध्ये धार्मिक विधीचे वाचनानंतर त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी सकल जैन समाज, व्यापारी, वकील, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### चांदा येथे पावसाची दमदार हजेरी



**चांदा** : नेवासा तालुक्यातील चांदा येथे शुक्रवारी सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान पावसाने दमदार हजेरी लावल्याने परिसरात समाधान कारक वातावरण निर्माण झाले आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून ते आज तगायत पाहिजे तसा पाऊस झाला नव्हता परंतू दोन दिवसा पूर्वी संध्याकाळी पावसाने दिलेली पहिली सलामी व आजच्या झालेल्या पावसाने चांदा व परिसरात समाधान कारक वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे उन्हाळ्याचा चटका कमी होऊन हवेत गारवा निर्माण झाला आहे व घरातील फॅनचे स्पीड करावे लागले. तसेच ज्या शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली आहे त्यांच्या साठी हा पाऊस समाधानकारक आहे व ज्या शेतकऱ्यांना कपाशी सोयाबीन मुग आदी पिकांची लागवड करायची आहे त्यांच्यासाठी देखील हा पाऊस चांगला झाला असल्याचे मत काही शेतकऱ्यांनी व्यक्त केले. अजून मोठ्या पावसाच्या हजेऱ्या अपेक्षित आहे आज तरी या पावसामुळे समाधान कारक वातावरण निर्माण झाले आहे.

### शेतकऱ्यांसाठी निंबोळी बीज अर्क कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक



**चांदा** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत मुळा एज्युकेशन सोसायटीचे सोनई येथील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण जागरूकता व कृषि कार्यानुभव अंतर्गत नेवासा तालुक्यातील बऱ्हाणपूर या गावामध्ये शेतकऱ्यांची भेट घेऊन अनेक शेतकरी एकत्रित बोलावून त्यांना निंबोळी बीज अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिक त्यांच्या समोर सादर करण्यात आले. येथील शेतकऱ्यांनी या निंबोळी बीज अर्क प्रात्यक्षिक विषयी माहिती जाणून घेतली. या वेळी कृषिकन्या पोर्णिमा काळभोर,साक्षी भांबुरे, प्रतीक्षा गोडसे, आर्द्रा नायर, हिमांशी गवळी यांनी या निंबोळी बीज अर्क प्रकल्पा मध्ये सहभाग घेतला.

# दिव्यांगांच्या चेहऱ्यावरील समाधान माझ्यासाठी खरी पूजा : आ. आशुतोष काळे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : दिव्यांगांना मदत करणे हे माझे समाजाप्रती असलेले कर्तव्य आहे. प्रत्येक दिव्यांगाने कोणावरही अवलंबून न राहता स्वाभिमानाने जगावे या उद्देशातून आजवर आयोजित करण्यात आलेल्या शिबिराच्या माध्यमातून जवळपास ८०० हून अधिक दिव्यांगांना कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साहित्य उपलब्ध करून दिले आहे.त्यामुळे त्या दिव्यांग बांधवांच्या वेदना तर दूर झाल्याच आहेत परंतु त्यांना जीवन जगतांना येणाऱ्या अडचणी देखील बहुतांश प्रमाणात संपूष्टात येवून त्यांच्या स्वालंबनाला नवीन बळ मिळाले हि माझ्यासाठी समाधानाची बाब आहे.

दिव्यांग बांधवांना दयेची नव्हे, तर सन्मानाची गरज असून दिव्यांगांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान आणि हास्य ही माझ्यासाठी खरी देवपूजा, ध्यान आणि जप असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले आहे. श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती, मुंबई (जयपूर) व आमदार आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून कोपरगाव मतदार संघातील दिव्यांग बंधू भगिनींसाठी दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात गुरुवार दि.२५ रोजी दिव्यांग बंधू भगिनींची तपासणी करून दिव्यांगांच्या गरजेनुसार कृत्रिम अवयवांचे अचूक मोजमाप घेऊन शुक्रवार (दि.२६) रोजी कृत्रिम अवयव आणि सहाय्यक साहित्याचे आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते कोपरगाव येथील महात्मा गांधी जिल्हा प्रदर्शन चॅरिटेबल ट्रस्टच्या सभागृहात १९७ दिव्यांग बांधवांना वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.



पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे म्हणाले कि, दिव्यांग बंधू भगिनींना दिव्यांग प्रमाणपत्र काढण्यासाठी सिव्हील हॉस्पिटल अहिल्यानगर येथे जाण्या-येण्याच्या अनेक अडचणी येत असल्याने दर महिन्याच्या पहिल्या बुधवारी मोफत वाहन सुविधा गेल्या सात वर्षांपासून अविरतपणे सुरु आहे. या सुविधेच्या माध्यमातून आजपर्यंत दोन हजारहून अधिक दिव्यांग बंधू भगिनींनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळाले असून त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत आहे. मतदार संघातील जनतेच्या आशीर्वादाने दुसऱ्यांदा आमदार म्हणून काम करायची संधी मिळाली.

या संधीच्या माध्यमातून जनसेवा करीत आहे. दिव्यांग बांधवांच्या अडचणी व त्यांचे परावलंबी जीवन स्वावलंबी कसे करता येईल यासाठी माझा खटाटोप सुरु असून मतदारसंघातील दिव्यांग बांधवांना दैनंदिन जीवनात येणाऱ्या अडचणी दूर करून त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे आणि यापुढेही करीत राहणार असल्याची ग्वाही आमदार आशुतोष काळे यांनी यावेळी दिली.

यांप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे पदाधिकारी, श्री भगवान महावीर विकलांग सहायता समितीचे पदाधिकारी, साईबाबा संस्थान शिर्डी हॉस्पिटलचे डॉक्टर व त्यांचे सहकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव व त्यांचे नातेवाईक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> शारीरिक व्यंगामुळे परावलंबी आयुष्य जगण्याची वेळ कोणावरही येऊ नये. प्रत्येक दिव्यांग बांधवाने स्वाभिमानाने, आत्मविश्वासाने आणि ताठ मानेने स्वतःच्या पायावर उभे राहून आयुष्य जगावे ही माझी मनापासूनची इच्छा आहे. त्यांच्या आयुष्यातील वेदना, अडचणी आणि असहाय्यता शक्य तितकी कमी करणे ही केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर समाजातील एक संवेदनशील माणूस म्हणून माझी सामाजिक बांधिलकी आहे. त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा उमटणारे समाधानाचे हास्य, डोळ्यांत दिसणारा आत्मविश्वास आणि स्वावलंबी आयुष्याची नवी उमेद हा माझ्यासाठी आशीर्वाद आहे.
>
> **आ. आशुतोष काळे**

# नेवासेत अवैध दारू विक्रीचा आरोप

## बनावट दारू कनेक्शनच्या चौकशीची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा शहरात अवैधरित्या इंग्लिश व देशी दारूची विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असून त्यामागे बनावट दारूचे रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता तपासून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी राजेंद्र रामदास पोतदार (नेवासा) व चंद्रशेखर नारायण व्यंकटरामन (श्रीरामपूर) यांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग तसेच नेवासा पोलीस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले की, नेवासा बसस्थानक परिसरासह शहरातील काही छोट्या दुकानांमधून खुलेआम दारूची विक्री केली जात असल्याने परिसरात दारुड्यांची वर्दळ वाढली आहे. यामुळे नागरिकांना त्रास होत असून कायदा व सुव्यवस्थेचाही प्रश्न निर्माण होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय शासनाकडून अधिकृत परवाना घेऊन व्यवसाय करणाऱ्या दारू विक्रेत्यांना दरवर्षी लाखो रुपयांचे परवाना शुल्क, वीजबिल, कर्मचारी वेतन व इतर खर्च करावे लागत असताना अवैध विक्रेते कोणत्याही नियमांचे पालन न करता व्यवसाय करत असल्याने परवानाधारक व्यावसायिकांवर अन्याय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अलीकडेच श्रीरामपूर शहरालगत राज्य उत्पादन शुल्क विभागाने बनावट दारू तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकून मोठा साठा जप्त केला होता. त्या कारखान्यात तयार होणाऱ्या बनावट दारूचे कनेक्शन नेवासातील अवैध विक्रेत्यांशी असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा संशय व्यक्त करत या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करण्याची मागणीही करण्यात आली आहे. बनावट अथवा विषारी दारूची विक्री सुरू राहिल्यास भविष्यात गंभीर जीवितहानी होण्याचा धोका असल्याने अवैध दारू विक्री तातडीने बंद करून संबंधित रॅकेटचा पर्दाफाश करावा आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, गृहमंत्री तसेच राज्य उत्पादन शुल्क आयुक्त यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# कुकाण्यात मोहरम निमित्त वाघांची मिरवणुक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील कुकाणा येथे दरवर्षी प्रमाणे मोहरम निमित्ताने नवसाचे वाघ रंगविण्यात आले व त्यांची गावातुन सवाद्य मिरवणुक काढण्यात आली ही मिरवणुक शांततेत व उत्साहात संपन्न झाली.



या मिरवणुकीत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हमीद नालबंद, जामे मस्जिद पंच कमिटीचे अध्यक्ष प्रा.रज्जाकशहा इनामदार,पापाभाई शेख, माजी उपसरपंच बाळासाहेब कचरे, याकुब शेख, अय्युब शेख, मुसाभाई तांबोळी,कलिम शेख, राजू नालबंद, फिरोज शेख,अकील तांबोळी,तोफीक नालबंद,रिहान शेख, निजाम शेख, रफिक शेख,सरवर शहा, अहमद तांबोळी,बालम शेख हे उपस्थित होते. यावेळी सिफान शेख, अय्युब नालबंद,साहिल शेख, अलतमश शेख, मुश्ताक शेख या चिमुकल्या बालकांना नवसाचे वाघ रंगविण्यात आले. मोहरम ताजिया सणानिमित्त मानाच्या मुजावर ताजियाला येथील देशमुख कुटुंबीयाकडून ड देविसिंह देशमुख यांच्या हस्ते फुलांची चादर अर्पण करण्यात आली.

पोलिस निरीक्षक प्रताप दराडे , पोलिस निरीक्षक विकास पाटील ,पो.ना.शहाजी आंधळे,पो.ना.बाबासाहेब वाघमोडे ,यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देत, शांततेत मोहरम साजरा करण्याचे आवाहन केले.

# लोकांच्या गरजा सोडवण्याला व विकास कामांना प्राधान्य : आ. अमोल खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : श्री क्षेत्र निझर्णेश्वर येथे दर्शनासाठी मोठ्याप्रमाणात भाविक येत असतात. त्यामुळे नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून रस्त्याच्या कामासाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. विकासाची कामे करताना मी कधीही राजकारण करत नाही, केवळ लोकांच्या गरजा आणि विकासाला माझे प्रथम प्राधान्य असते, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. संगमनेर तालुक्यातील कोकणगाव येथील श्री क्षेत्र निझर्णेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे मजबूतीकरण आणि डांबरीकरण कामाचे भूमिपूजन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले.



यांप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यांप्रसंगी ज्येष्ठ नेते रामभाऊ जोंधळे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बबनराव पवार, खजिनदार बाळासाहेब जोंधळे, सचिव गंगाधर वायकर, भाजपचे दादाभाऊ गुंजाळ यांच्यासह महायुतीचे प्रमुख पदाधिकारी आणि ग्रामस्थं मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार खताळ यांनी गेल्या दीड वर्षांत कोकणगावच्या विकासासाठी २ कोटी ४७ लाख रुपयांचा निधी आणल्याची माहिती दिली. तसेच, ठेकेदाराला कामाचा दर्जा उत्तम राखण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत. या कार्यक्रमादरम्यान आमदार खताळ यांनी पुणे-नाशिक रेल्वेमार्ग संगमनेरमार्गेच व्हावा, यासाठी आपण खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि इतर मंत्र्यांसमवेत केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट घेणार असून, या मार्गासाठी पूर्ण ताकदीने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही दिली.

दरम्यान, विविध विकासकामांच्या उध्दघाटनापूर्वी आमदार खताळ यांनी श्री निझर्णेश्वर मंदिरात जाऊन भगवान महादेवाचे दर्शन घेतले. देवस्थान समितीच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. परिसरातील ग्रामस्थांनी विकासाच्या कामांना दिलेल्या गतीबद्दल आमदार खताळ यांचे कौतुक केले.

> **पर्यटनासाठी 'बिबट सफारी'चा प्रस्ताव..**
>
> निझर्णेश्वर मंदिर परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्यासाठी वनविभागामार्फत राज्य सरकारकडे 'बिबट सफारी' उभारण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. हा प्रस्ताव आता केंद्राकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. ही सफारी साकारल्यास या भागातील युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास आ. खताळ यांनी व्यक्त केला.

# कोयटे व सुधीर डागा यांचा व्यापाऱ्यांकडून सत्कार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : काका कोयटे आणि सुधीर डागा यांची राज्यस्तरीय महत्त्वाच्या पदांवर झालेली निवड ही केवळ त्यांचा वैयक्तिक सन्मान नसून संपूर्ण कोपरगावच्या व्यापारी व सहकार क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्व, दूरदृष्टी आणि सातत्यपूर्ण कार्यामुळे कोपरगावचे नाव राज्यभर पोहोचले असून भविष्यातही व्यापारी, उद्योजक आणि सहकार क्षेत्राच्या विकासासाठी त्यांचे मार्गदर्शन लाभदायी ठरणार असल्याचा विश्वास कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे सचिव प्रदीप साखरे यांनी व्यक्त केला.

राज्यातील अग्रगण्य समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन, कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कोपरगाव तालुका किराणा मर्चंट असोसिएशनचे संस्थापक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांची महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या कार्यकारी अध्यक्षपदी, तसेच कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष सुधीर डागा यांची महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कोपरगाव शहरातील समस्त व्यापारी व किराणा दुकानदारांच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यापारी महासंघाचे उपाध्यक्ष अजित लोहाडे, खजिनदार तुलसीदास खुबानी, सचिव प्रदीप साखरे, महावीर सोनी, गुलशन होडे, किरण शिरोडे, आनंद लोढा, युवराज गांगवे, आशुतोष पटवर्धन, सुमित भट्टड, उल्हास गवारे, श्याम जंगम, पप्पूशेठ मुंदडा, प्रीतम बंब, यश विसपुते, नारायण लांडगे, धीरज कराचीवाला, हर्षल कृष्णानी, मानव शुक्ला, हर्षल जोशी यांच्यासह विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी, किराणा व्यावसायिक आणि व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी काका कोयटे आणि सुधीर डागा यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांचा पुष्पहार, शाल, श्रीफळ देऊन अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी काका कोयटे यांच्या सहकार क्षेत्रातील दीर्घ अनुभवाचा आणि सुधीर डागा यांच्या व्यापारी संघटनांमधील कार्याचा गौरव केला. त्यांच्या निवडीमुळे कोपरगावच्या व्यापारी व सहकार क्षेत्राला राज्यस्तरावर अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

> महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा गाव तिथे उद्योजक हा उपक्रम आणि कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाचा मेक इन कोपरगाव हा उपक्रम कोपरगाव तालुका व्यापारी महासंघाच्या वतीने लवकरच हाती घेणार आहोत.
>
> **ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे,**
> **अध्यक्ष, कोपरगाव तालुका व्यापारी महासंघ**

# रक्तदानाचे अर्ध शतक पूर्ण केल्याबद्दल बालेंद्र पोतदार यांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील सामाजिक क्षेत्रात योगदान देणारे व्यक्तिमत्त्व व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे प्रणित शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार यांनी रक्तदानाचे अर्ध शतक पूर्ण केल्याबद्दल त्यांचा गौरव एस बी आय बँकेचे शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी एस बी आयच्या झालेल्या रक्तदान शिबिरात बालेंद्र पोतदार यांनी आपल्या जीवनातील पन्नासावे रक्तदान करून रक्तदानाचे अर्धशतक पूर्ण केले.



यावेळी झालेल्या सन्मान सोहळयाच्या प्रसंगी बालेंद्र पोतदार यांचा शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते बुके शाल व वस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी वृक्ष मित्र अमृत फिरोदिया,सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ केंदळे,गोल्ड व्हॅल्यूयर कृष्णा डहाळे,शांताराम गायके, प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण, बँकेचे उपप्रबंधक राकेश कुकटला,विनोद चव्हाण, कॅशियर संदीप दुधाळे, विशाल आदिक,रुपाली काळे, दीपक गायकवाड,छोटू जिरे यांच्यासह बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलातील वेदांतने जिंकली ५० मेडल्स

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : जर्मनी येथे सुरू असलेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेत त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा आंतरराष्ट्रीय खेळाडू वेदांत वाघमारे याने ५० मीटर ३ पी खेळ प्रकारात सांघिक कास्य पदक मिळवून आपल्या गेल्या सात वर्षाच्या कारकिर्दीतील ५० वे मेडल जिंकून विक्रमी कामगिरी केली आहे.



वेदांत नितीन वाघमारे याने आतापर्यंत ०९ आंतरराष्ट्रीय, २५ राष्ट्रीय आणि १६ राज्यस्तरीय मेडल्स जिंकून संस्थेची कीर्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली आहे, माझ्या त्रिमूर्तीचा विद्यार्थी ऑलिंपिक मध्ये देशासाठी सुवर्णपदक जिंकेल हे शिक्षण महर्षी साहेबराव घाडगेपाटील यांचे स्वप्न होते. वेदांच्या या यशस्वी वाटचालीमुळे ते स्वप्न साकार होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे,अशी भावना त्रिमूर्ती परिवाराने व्यक्त केली.

या यशाबद्दल त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड. सुमती साहेबराव घाडगे,उपाध्यक्ष ड.स्नेहल चव्हाण, सहसचिव डॉ. श्रुती आमले, कार्यकारी अधिकारी डॉ. गौरव आमले, विश्वस्त चेतन चव्हाण, समन्वयका डॉ. अनुराधा गोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, डॉ. बर्गे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आणि पुढील कार्य शुभेच्छा दिल्या. वेदांत वाघमारे यास रायफल शूटिंगचे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक छबुराव काळे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

## पान १ वरुन

### अधिकारी बदलले; यंत्रणा कधी बदलणार..?

विशेषतः ज्या कर्मचाऱ्यांबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी केल्या जातात, अशा प्रकरणांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे. काही ठिकाणी नागरिकांकडून वर्तन, प्रतिसाद, कामातील विलंब किंवा अवैध प्रकारांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या तक्रारी होत असतात. अशा वेळी केवळ अधिकारी बदलून अपेक्षित सुधारणा होईलच, असे नाही.

पोलिस यंत्रणेत बदलाचा परिणाम दिसण्यासाठी तळागाळातील यंत्रणाही बदलणे आवश्यक असते. अधिकारी धोरणात्मक निर्णय घेतात, पण त्याची अंमलबजावणी कर्मचारी स्तरावर होत असते. त्यामुळे संपूर्ण यंत्रणेला नव्याने उभे करण्याचा विचार असेल, तर बदल्यांचा पुढचा टप्पा कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे ठरू शकते. जिल्हा पोलिस अधीक्षकांनी सुरू केलेल्या कारवाया आणि अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे पोलिस यंत्रणेत हालचाल निर्माण झाल्याचे चित्र आहे. मात्र हा बदल कायमस्वरूपी आणि परिणाम कारक ठरवायचा असेल, तर पुढचा टप्पा म्हणून तळागाळातील कर्मचारी व्यवस्थेकडेही लक्ष देणे आवश्यक ठरणार आहे. कारण बदल केवळ खुर्चीचा न राहता कामकाजात दिसला, तरच नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्याचे मानले जाईल.

### सेवापूर्ती की राजकीय लॉंचिंग? कळमकरांच्या सत्कारातून रंगली नवी चर्चा

हा भाग असू शकतो का, यावरही चर्चा सुरू झाली आहे.

तथापि, केवळ व्यासपीठावरील गौरव किंवा राजकीय निमंत्रण यामुळे राजकीय यश निश्चित होत नाही. जनसंपर्क, संघटन, सातत्यपूर्ण काम, व्यापक स्वीकार आणि राजकीय पाठबळ या सर्व घटकांची परीक्षा प्रत्यक्ष निवडणुकीतच होते. अहिल्यानगरच्या राजकारणात शिक्षक मतदारसंघाचे महत्त्व कायम राहिले आहे. त्यामुळे डॉ. संजय कळमकर यांची भविष्यातील भूमिका काय असेल, ते कोणत्या राजकीय प्रवाहाशी स्वतःला जोडतील आणि प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरतील का, याकडे आता शिक्षकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सध्या तरी एवढेच स्पष्ट दिसते की, सेवापूर्तीचा सत्कार संपला असला, तरी डॉ. संजय कळमकर यांच्या संभाव्य राजकीय प्रवासाविषयीची चर्चा आता नव्याने सुरू झाली आहे. मंचावरील टाळ्यांपेक्षा त्या निमंत्रणाचा राजकीय अर्थ अधिक मोठा ठरतो का, याचे उत्तर येणारा काळच देईल.

### अनधिकृत जैविक औषधांची विक्री केल्यास कृषी केंद्रांवर होणार कायदेशीर कारवाई

'खत नियंत्रण आदेश १९८५' च्या कक्षेत समाविष्ट करण्यात आली आहेत. या बदललेल्या नियमांनुसार, कृषी विभागाला शासनाकडून एक अंतरिम यादी प्राप्त झाली आहे. या यादीमध्ये कोणत्या जैविक औषधांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे, याची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यात फक्त परवानाधारक जैविकांच्या विक्रीलाच परवानगी शासनाकडून प्राप्त झालेल्या यादीचा दाखला देत कृषी विभागाने स्पष्ट केले आहे की,ज्या जैविक औषधांना 'खत नियंत्रण आदेश १९८५' नुसार उत्पादन व विक्रीसाठी रीतसर कायदेशीर परवाना प्राप्त झालेला आहे, केवळ अशाच अधिकृत जैविकांची विक्री दुकानदारांनी करावी.

ज्या उत्पादनांना किंवा जैविकांना विक्रीसाठी आवश्यक परवाना मिळालेला नाही, त्यांची विक्री विक्रेत्यांनी आपल्या स्तरावरून पूर्णपणे बंद करावी, असे तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे गुणनियंत्रण अधिकारी अभय एम. थोरात आणि कृषी अधिकारी ए. आर. खेडकर यांनी या परिपत्रकाद्वारे सर्व निविष्ठा विक्रेत्यांना बजावले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रशासनाकडून कडक पावले उचलली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहेत.

### राम मंदिराच्या कोट्यवधींच्या देणगीत डल्ला?

लवकुश मिश्रा, करुणेश पांडे, अविनाश शुक्ला, मनीष यादव, राम शंकर मिश्रा आणि सुभाषचंद्र श्रीवास्तव यांची नावे नमूद करण्यात आली आहेत. तपास यंत्रणा आरोपींची बँक खाती, मालमत्ता, मोबाईल कॉल रेकॉर्ड तसेच आर्थिक व्यवहारांची सखोल छाननी करत आहे.

या प्रकरणाची तक्रार श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे विश्वस्त कृष्ण मोहन यांनी दाखल केली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये ट्रस्टवर नियुक्त झालेल्या कृष्ण मोहन यांनी यापूर्वी भारतीय वन सेवेतील वरिष्ठ अधिकारी म्हणून महाराष्ट्र केडरमध्ये काम केले असून, सेवानिवृत्तीनंतर ते सामाजिक कार्यात सक्रिय आहेत.

दरम्यान, चंपत राय आणि डॉ. अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्यामुळे या प्रकरणाला नवे राजकीय आणि सामाजिक परिमाण मिळाले आहे. तथापि, त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झालेला नसून, त्यांच्या राजीनाम्याचा संबंध एसआयटीच्या तपासातील उत्तरदायित्वाशी जोडला जात असल्याची चर्चा आहे.

एसआयटीचा अंतिम अहवाल येत्या काही दिवसांत सादर होण्याची शक्यता असून, त्यातून आणखी धक्कादायक खुलासे होणार का, ट्रस्टच्या कामकाजात बदल होणार का आणि तपासाची व्याप्ती वाढणार का, याकडे देशभरातील रामभक्तांचे लक्ष लागले आहे.

# आरटीओ अधिकाऱ्यांच्या व्हायरल ऑडिओची पोलिसांत तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : येथील परिवहन विभागातील अधिकाऱ्यांमध्ये अधिकार क्षेत्रावरून झालेल्या चर्चित वादप्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. अधिकाऱ्यांमधील संभाषणाची ऑडिओ रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे आधीच चर्चेत असलेला ''भारत-पाकिस्तान बॉर्डर'' वाद पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी गणेश विघ्ने यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत आरटीओ विभागातील चालक गजानन फड याच्यावर गंभीर आरोप केले आहेत. तक्रारीनुसार, फड यांनी गुप्तपणे मोबाईलवर अधिकाऱ्यांमधील संभाषणाची रेकॉर्डिंग केली आणि ती सोशल मीडियावर प्रसारित केली. यामुळे परिवहन विभाग तसेच शासनाची प्रतिमा मलीन झाल्याचे विघ्ने यांनी म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर परिवहन विभागातील दोन अधिकाऱ्यांमधील संभाषणाची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. या क्लिपमध्ये अधिकार क्षेत्रावरून झालेल्या वादादरम्यान ''ही भारत-पाकिस्तानची बॉर्डर आहे का?'', ''मी कोण आहे?'' आणि ''माझा बॅच कोणता आहे?'' अशा स्वरूपाचे संवाद ऐकू येत होते. या ऑडिओमुळे विभागातील अंतर्गत मतभेद आणि समन्वयाचा अभाव उघड झाल्याची चर्चा रंगली होती.

माहितीनुसार, परिवहन विभागाने विविध जिल्ह्यांमध्ये कारवाईसाठी स्वतंत्र पथके नियुक्त केली होती. मात्र एका वाहनावर दोन वेगवेगळ्या पथकांकडून कारवाई झाल्याने हा वाद निर्माण झाला. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेची रेकॉर्डिंग व्हायरल झाल्याचे समोर आले.

दरम्यान, गणेश विघ्ने यांनी यापूर्वी व्हायरल झालेली ऑडिओ क्लिप अपूर्ण असल्याचा दावा केला होता. अधिकाऱ्यांमध्ये सुमारे दहा मिनिटे चर्चा झाली होती, मात्र सोशल मीडियावर केवळ तीन मिनिटांचा भाग प्रसारित करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. आता पोलिसांकडे तक्रार दाखल झाल्याने रेकॉर्डिंग कोणी केली, ती व्हायरल कशी झाली आणि या प्रकरणात नेमकी जबाबदारी कोणाची आहे, याचा तपास सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## आशुतोष पुलाटे यांच्याकडून विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले युवा उद्योजक तथा पी-९९ सॉफ्टवेअर प्रा. लि.चे कार्यकारी अध्यक्ष आशुतोष पुलाटे यांनी ना. राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत दुर्गापूर येथील विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप केले.



ग्रामीण भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सामाजिक उपक्रम राबविण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत पुलाटे यांनी आपल्या शिक्षणाची पायाभरणी झालेल्या प्रवरा माध्यमिक विद्यालयातील ५१ विद्यार्थ्यांना गणवेश, तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शंभरहून अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण केले.


यावेळी आशुतोष पुलाटे म्हणाले, ''ज्या शाळेने मला घडवले, त्या संस्थेचे आणि समाजाचे ऋण फेडण्यासाठी हा छोटासा प्रयत्न आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील व पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून उभ्या राहिलेल्या प्रवरा शैक्षणिक संकुलामुळेच मला जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मिळाली.''कार्यक्रमात प्रवरा माध्यमिक विद्यालयाच्या सेवानिवृत्त प्राचार्या संध्या रोकडे यांचा सत्कार करण्यात आला. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी पुलाटे यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत ग्रामीण भागातून यशस्वी झालेल्या युवकांनी शिक्षणासाठी योगदान देणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले.

प्रवरा सहकारी बँकेचे संचालक छगनराव पुलाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलीस पाटील हा शासन व ग्रामस्थांमधील महत्त्वाचा दुवा : एपीआय दीपक धनवटे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) आशिष शेळके यांची नाशिक जिल्ह्यात बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी अहिल्यानगर येथून दीपक धनवटे यांची नियुक्ती झाली



आहे. पदभार स्वीकारल्यानंतर शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील ॲड. सयाराम बानकर यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना एपीआय दीपक धनवटे यांनी ''पोलीस पाटील हा शासन आणि ग्रामस्थांमधील महत्त्वाचा दुवा असून गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे,'' असे प्रतिपादन केले.यावेळी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध गावांमधील कायदा व सुव्यवस्था, सण-उत्सवांच्या काळातील मिरवणुका, तसेच शांतता व सुरक्षा राखण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. पोलीस प्रशासन आणि पोलीस पाटील यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्याबाबतही चर्चा झाली. या स्वागत समारंभाला पोलीस पाटील संघटनेचे नेवासा तालुका अध्यक्ष रमेश डोळे, संदीप फाटके, शिवाजी असणे, सुरेश नवगिरे यांच्यासह तालुक्यातील अनेक पोलीस पाटील उपस्थित होते.

यावेळी एपीआय धनवटे यांनी सांगितले की, पोलीस पाटील हे पद ब्रिटिशकालापासून अस्तित्वात असून गावपातळीवरील प्रशासन, कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक सलोखा राखण्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. गावातील घडामोडींची अचूक माहिती पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पोलीस पाटील करत असल्याने त्यांचे सहकार्य प्रशासनासाठी मोलाचे ठरते. पोलीस आणि पोलीस पाटील यांच्यातील समन्वय मजबूत राहिल्यास कायदा व सुव्यवस्था राखणे अधिक प्रभावी ठरते. नव्याने रुजू झालेल्या अधिकाऱ्यांनीही या समन्वयाला प्राधान्य दिल्याने ग्रामीण भागातील पोलीस अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**नावात बदल**

माझे पहिले नाव
**गुलझार तेजनी**
आणि आताचे नवीन नाव बदलुन
**गुलझार अजय तेजनी**
असे आहे. आधार कार्ड
नं.७५३७८०१०५६८३
आधारकार्डप्रमाणे व श्रीरामपूर
नोटरी पब्लीक समोर कोटरी
केलेली आहे.
दि.२०/०६/२०२६

## तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अंकुश जाधव बिनविरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : मराठवाड्यातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या गंगापूर तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अंकुश जगन्नाथ पाटील जाधव यांची सर्व संचालक मंडळाच्या विशेष सहकार्याने बिनविरोध निवड करण्यात आली असून तसेच व्हाईस चेअरमन सुनीता कोटुवार, सचिवपदी संदीप शिरकुले व कोषाध्यक्षपदी मीरा गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. ही निवड मधुकरराव वालतुरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष व संचालक राजेश हिवाळे यांच्या उपस्थितीत सर्वानुमते पार पडली. यावेळी माजी चेअरमन जे. के. चव्हाण, संजय भडके, सतीश कबाडे आदींची उपस्थिती होती. सहकार अधिकारी म्हस्के यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून, तर सहायक सहकार अधिकारी शेख यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. यावेळी अर्थ व बांधकाम सभापती तथा लासुर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष जाधव, माजी सचिव तथा संचालक लक्ष्मण उबाळे, प्रदीपदादा जाधव, नारायण कोकरे, विनोद डिके, संतोष आळंजकर, माजी चेअरमन सुनील जाधव, अनिल काळे, भगवान हिवाळे, कडुबा हारदे, अल्ताफ शेख, शिवाजीराव काळे, संपतराव शिंदे, तालुका शिक्षक संघाचे अध्यक्ष कल्याणराव राजूत, ज्येष्ठ शिक्षक नेते सुनील जोशी आदीसह शिक्षक, संचालक, माजी पदाधिकारी व शिक्षक संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भाजपमध्ये मराठा विरुद्ध ब्राह्मण वाद?

प्रोटोकॉल महत्त्वाचा असतो, जात नव्हे, असे स्पष्ट करत त्यांनी या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.कुलकर्णी यांनी अभिमन्यू पवार यांच्या निवडणुकीचाही उल्लेख केला. त्यांनीच मला ब्राह्मण समाजाच्या मेळाव्यात येऊन त्यांच्यासाठी मतदानाचे आवाहन करण्याची विनंती केली होती. प्रकृती ठीक नसतानाही मी त्यांच्यासाठी प्रचार केला आणि ब्राह्मण समाजाने त्यांना पाठिंबा दिला, असा दावा त्यांनी केला.याशिवाय मुख्यमंत्री फडणवीस यांना एका गंभीर विषयावर भेटण्यासाठी गेलो असताना अभिमन्यू पवार यांनी पोलिसांना अडवण्याच्या सूचना दिल्याचाही आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्र्यांना कोण भेटणार हे आता अभिमन्यू पवार ठरवणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.या प्रकरणामुळे भाजपमध्ये मराठा-ब्राह्मण प्रतिनिधित्वाचा वाद पुन्हा ऐरणीवर आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली असून, अभिमन्यू पवार यांची भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## शेतकऱ्यांनी बनवला २०० लिटर दशपर्णी अर्क

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील सत्यमेव जयते फार्मर कप पिक स्पर्धा मध्ये सहभागी असलेला फार्म गोल्ड शेतकरी गट महांकाळवाडगाव यांनी स्पर्धेत सहभागी होऊन विविध उपक्रमात सर्व सदस्यांचा उत्कृष्टप्रकारे सहभाग नोंदविला आहे २६ जून रोजी सर्वांनी एकत्रित बियाणे व बीजप्रक्रिया औषध खरेदी केले असून पेरणीची तयारी केली असून बी बी एफ तंत्रज्ञान डरे पेरणी करावयाचे नियोजन केले आहे गटाचे विविध उपक्रम राबविण्यात येताना कृषी विभागाचे नीलेश बिबवे , सनी शेलार , . डांगे , सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन मिळाले

यावेळी गटाचे सचिव रवींद्र पवार, अध्यक्ष अजित पवार तसेच संदीप सांगळे, विजय पवार, सोपान पवार, भागवत पांढरे, रूपाली पवार, शुभांगी पवार, कमलबाई पवार, सविताताई पवार, मिनाबाई आदिक, शोभाताई सांगळे, मोठ्याबाई पवार, प्रशांत खुरुद, हर्षद पवार आदी सदस्य उपस्थित होते नंतर गटाचे अध्यक्ष अजित नारायण पवार यांनी सर्वांचे आभार मानले.

**CORRECTION IN NAME**

Name in old Passport Waghmare Amit Name in Record Waghmare Amit Shivajirao (Aadhar No. 779011217859) Place: Loni Date: 27/06/2026

## सहकारातील ज्येष्ठ नेते बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**संगमनेर:** देशासाठी मार्गदर्शक ठरलेल्या संगमनेरच्या अमृत उद्योग समूहातील विविध सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये योगदान असलेले सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन ज्येष्ठ नेते बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी वृद्धकाळाने निधन झाले आहे.




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकाराच्या माध्यमातून संगमनेर तालुक्याच्या विकासाचा पाया घातला. लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सततच्या कामांमधून हा तालुका राज्यात प्रगतशील बनवला. संगमनेरच्या सहकारी संस्थांच्या उभारणीमध्ये सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या समवेत बाळासाहेब गुंजाळ पाटील यांचे मोलाचे योगदान राहिले. त्यांनी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना, शेतकी संघाचे चेअरमन पद भूषवले याचबरोबर.मार्केट कमिटी, दूध संघ, संगमनेर विभाग सेवा सोसायटी, अमृतवाहिनी शिक्षण संस्था,सह्याद्री शिक्षण संस्था या विविध संस्थांमध्ये मोलाचे योगदान दिले. वयाच्या ९८ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला गुंजाळ परिवार हा तालुक्यातील मोठा परिवार आहे. हरिश्चंद्र फेडरेशनचे अध्यक्ष राजेंद्र पाटील गुंजाळ यांचे ते वडील होय.

## निधन वार्ता

### रमजान करीम



**श्रीरामपूर** : काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते,श्रीरामपूर शहर काँग्रेसचे दीर्घकाळ अध्यक्ष, ३५ वर्षे नगरसेवक राहिलेले मुस्लिम समाजाचे जेष्ठ नेते शेख रमजान करीम उर्फ हाजी रमजानी मामू (वय ९६) यांचे वृद्धापकाळाने काल सकाळी दुःखद निधन झाले. रामनवमी यात्रा कमिटीचे विश्वस्त म्हणून देखील त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, नातवंडे, सुना असा मोठा परिवार आहे.

### रजनीकांत शहाणे



**श्रीरामपूर,** : येथील खादी कापड विक्रेते रजनीकांत त्रिंबकराव सहाणे (वय ९२) यांचे गुरूवार, दि. २५ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते श्रीराम तरुण मंडळाचे सदस्य सतिश शहाणे, विजय, संतोष व प्रदीप शहाणे यांचे ते वडील होत.

### डरकाबाई शिंदे



**सोनई** : येथील वयोवृद्ध डरकाबाई मच्छिन्द्र शिंदे (वय -८३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले व दोन मुली असा परिवार आहे. राज्य कृषी सेवा केंद्राचे सेवानिवृत्त प्रमोद मच्छिंद्र शिंदे,प्रदीप मच्छिंद्र शिंदे यांच्या मातोश्री तर महेश( बालू) प्रभाकर शिंदे यांची चुलती होत.

## मुळा कारखाना निवडणुकीत ४९.५५ टक्के मतदान; एकतर्फी लढतीची चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेडच्या पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि.२६ जून) कारखाना परिसरातील मतदान केंद्रावर सकाळी ७ ते सायंकाळी ५ या वेळेत शांततापूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली. एकूण १६ हजार ९४४ मतदारांपैकी ८ हजार ३९५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून, अंतिम मतदानाची टक्केवारी ४९.५५ इतकी नोंदविण्यात आली. अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाल्याने त्यामागील राजकीय कारणांची चर्चा दिवसभर सुरू होती.

या निवडणुकीत माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखालील सहकार पॅनल आणि आमदार विठ्ठल लंघे तसेच उद्योजक प्रभाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखालील विरोधी गट यांच्यात प्रमुख लढत झाली. मात्र, विरोधी गटाला सर्व जागांवर उमेदवार उभे करता आले नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांनी ही निवडणूक सुरुवातीपासूनच तुलनेने एकतर्फी झाल्याची भावना व्यक्त केली.

करजगाव गटातून सहकार पॅनलकडून चंद्रकांत भानुदास टेमक व ज्ञानेश्वर रामराव दरंदले, तर महिला प्रतिनिधी मतदारसंघातून कमल चांगदेव दहिफळे व विमल नारायण सोनवणे हे उमेदवार रिंगणात आहेत. विरोधी गटाकडून केवळ किरण जाधव व नारायण डवले या दोन उमेदवारांनी निवडणूक लढविल्याने संपूर्ण पॅनल उभे राहू शकले नाही.तर महिला राखीव गटातील विरोधी उमेदवार मीराबाई दिवटे यांनी सहकार पॅनलला पाठिंबा दिला होता.

प्रचारकाळात दोन्ही गटांनी सभा, बैठका, पदभ्रमण आणि समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या, विकासकामांपासून कारखान्याच्या भवितव्यापर्यंत विविध मुद्द्यांवर राजकीय वातावरण तापले. मात्र, प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी वातावरण शांत राहिले.

सकाळच्या सत्रात मतदान केंद्रावर मतदारांची चांगली उपस्थिती दिसून आली. दुपारनंतर मतदानाचा वेग मंदावला, तर शेवटच्या तासात काही मतदारांनी मतदानासाठी गर्दी केली. निवडणूक निर्णय अधिकारी, कर्मचारी आणि पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात संपूर्ण प्रक्रिया कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीत पार पडली.

आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष मतमोजणीकडे लागले असून, शंकरराव गडाख यांच्या सहकार पॅनलचे कारखान्यावरचे वर्चस्व कायम राहणार की विरोधी गट अपेक्षेपेक्षा अधिक मते मिळवत राजकीय संदेश देणार, याचा फैसला मतमोजणीनंतर होणार आहे. सहकार क्षेत्रातील या महत्त्वाच्या निवडणुकीच्या निकालाकडे जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे.

**विश्लेषण : कमी मतदानाचे संकेत काय?**

या निवडणुकीतील ४९.५५ टक्के मतदान अनेक अर्थांनी महत्त्वाचे मानले जात आहे. कारखान्यासारख्या सहकारी संस्थेच्या निवडणुकीत सामान्यतः अधिक मतदानाची अपेक्षा असते. मात्र, यावेळी विरोधी गटाला सर्व जागांवर उमेदवार उभे करता न आल्याने निवडणूक अधिक चुरशीची होईल, अशी अपेक्षा पूर्ण झाली नाही.

राजकीय जाणकारांच्या मते, विरोधकांचे अपूर्ण पॅनल आणि तुलनेने एकतर्फी लढतीची भावना यामुळे काही मतदार मतदानापासून दूर राहिल्याचे दिसून आले. दुसरीकडे, सहकार पॅनलने आपली संघटनात्मक ताकद कायम ठेवत मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्याचा प्रयत्न केला. कमी मतदानाचा नेमका फायदा कोणाला होणार, हे मात्र मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे.



सोनई – मुळा साखर कारखाना निवडणुकीत मतदान करताना युवा नेते उदयन गडाख व उमेदवार ज्ञानेश्वर दरंदले.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

शनिवार दि .२७ जून २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १४९<br>२३९<br>५९० | ४-५ | २३०<br>७८०<br>६९० | ४६-९५-१०-<br>२७-५८ |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२०<br>६७०<br>५८० | ३-१ | १४६<br>१२८<br>११९ | ३०-७१-२५५-<br>९८-१६ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>२२८ | २-० | १९०<br>२८०<br>२४४ | २१-७०-३८-<br>६४-०९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 5 | |

द•ख•ल

## अग्रीपंख फौंडेशनकडून शालेय साहित्य वाटप



**श्रीगोंदा :** सामाजिक बांधिलकी जपत अग्रीपंख फौंडेशनच्या वतीने ढवळगाव येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व उपेक्षित कुटुंबातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. या कार्यक्रमात उद्योजक गणेश साळुंके, विकास आढाव व अनिरुद्ध लाकुडझोडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. अंकुश कऱ्हे व प्रतीक्षा रोटकर यांची पोलीस कॉन्स्टेबलपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विकास आढाव म्हणाले, आई-वडिलांच्या मार्गदर्शनाचा स्वीकार करून प्रामाणिकपणे वाटचाल केल्यास यश निश्चित मिळते. माझे वडील निरक्षर असले तरी त्यांचे संस्कार आणि मार्गदर्शन माझ्यासाठी लाखमोलाचे ठरले. अग्रीपंख फौंडेशनचे अध्यक्ष मोहन आढाव म्हणाले, शाळा आणि विद्यालये ही समाजपरिवर्तनाची खरी केंद्रे आहेत. त्यांना बळ देणे हेच आमचे ध्येय आहे. लवकरच शिक्षकांसाठी मोटिव्हेशन कॅम्प तसेच विद्यार्थी आणि खेळाडूंसाठी विशेष महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे.कार्यक्रमात फौंडेशनचे बाळासाहेब पवार यांनीही मनोगत व्यक्त केले.

## शेवगावमध्ये साकारणार 'नमो उद्यान'



**अमरापूर :** शेवगाव शहराच्या विकासाला चालना देणाऱ्या आणखी एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला लवकरच सुरुवात होणार आहे. नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये 'नमो उद्यान' उभारण्यात येणार असून या उद्यानासाठी सुमारे एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. एक एकर जागा उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती नगरसेवक सुनील काकडे यांनी दिली. प्रस्तावित उद्यानामुळे शहरवासीयांना स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध होणार आहे. उद्यानामध्ये आकर्षक वृक्षलागवड, हिरवळ, सुशोभिकरण, लहान मुलांसाठी खेळण्याची आधुनिक साधने तसेच नागरिकांसाठी जॉगिंग ट्रॅक उभारण्यात येणार आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक व बालकांसाठी हे उद्यान आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. शहरातील कोरडे वस्ती परिसरातील नागरिक विनय भारदे यांनी या सामाजिक उपक्रमासाठी एक एकर जागा उपलब्ध करून दिली. नगरसेवक सुनील काकडे यांनी त्यांचे विशेष आभार मानले. या प्रकल्पासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिवसेना नेते अरुण मुंडे, नगराध्यक्ष माया अरुण मुंडे, नगरसेवक आशुतोष डहाळे, ताहेर पटेल तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते वजीर पठाण व इतर नगरसेवकांनी सहकार्य केल्याचे सुनील काकडे यांनी सांगितले.

## चेक न वटल्याप्रकरणी आरोपीस ६ महिने कारावासाची शिक्षा

**अहिल्यानगर :** व्यवहारापोटी देण्यात आलेला चेक न वटल्याप्रकरणी आरोपी भैरु होळकर यांना अहिल्यानगर न्यायालयाने सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. फिर्यादी विवेक सुरेश तवले यांच्याकडून आरोपी यांनी हातउसने ३ लाख रुपये रक्कम घेतली होती. त्या रक्कमेची फिर्यादी तवले आरोपीकडे मागणी केली, असता आरोपीने फिर्यादी तवले यांना ३ लाख रुपयांचा चेक दिला होता. तो चेक फिर्यादी तवले यांनी त्यांच्या बँक खात्यात भरला होता. तो न वटता परत आला, म्हणून आरोपी होळकर विरुद्ध नि.ई.ॲक्ट कलम १३८ अन्वये फिर्यादी तवले यांनी एस.टी.सी.केस नंबर ४९२८/२०२२ ची अहमदनगर येथील अति.न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केली होती. या सुनावणीत आरोपी होळकर यास फिर्यादी तवले यांचे कायदेशीर देणे लागत असल्याचा ॲड.भगतसिंग गर्जे यांनी युक्तीवाद केला. तो युक्तीवाद न्यायालयाने ग्राह्य धरुन केसमधील आरोपी भैरु होळकर सहा महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. फिर्यादीच्यावतीने ॲड भगतसिंग गर्जे यांनी काम पाहिले, त्यांना ज्येष्ठ वकील पोपट टी. पालवे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## लोककलावंतांचे मानधन वाढवावे : धुमाळ

**अहिल्यानगर :** हिंदवी रेणुराई गोंधळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दशरथ धुमाळ यांनी लोककलावंतांच्या मागण्यांसंदर्भात नुकतीच आ. संग्राम जगताप यांना मागणीचे निवेदन दिले. विधानसभेचे अधिवेशन २२ जून २०२६ पासून सुरू झाले आहे. या अधिवेशनात जिल्ह्यातील लोककलावंतांच्या मागण्या आमदारांनी मांडाव्यात, अशी विनंती धुमाळ यांनी यावेळी आ. संग्राम जगताप यांच्याकडे केली. पारंपरिक लोककलावंतांची निवड इष्टांक पाचशे करावा, अशी मागणी केली. अहिल्यानगर जिल्हा क्षेत्रफळाने मोठा असल्याने आणि या जिल्ह्यात एकूण १४ तालुके असल्याने कलावंतांची निवड करण्यासाठी इष्टांक ५०० करावा आणि लोककलावंतांच्या मानधनामध्ये वाढ करून ते प्रतिमहा दहा हजार रुपये करावे, लोककलावंत हे भारतीय संस्कृतीचे रक्षक आहेत. ते शहर, गाव, वाड्या-वस्त्या, तांडे, डोंगर, पहाड सर्वच दुर्गम भागात जातात. पाऊसपाणी, ऊन वा थंडी अशा कोणत्याही ऋतूत ते आपल्या रोजीरोटीसाठी कला सादर करून संस्कृतीचे रक्षण करतात. यामधून त्यांना अत्यंत अल्प मानधन मिळते. त्यामुळे त्यांना शासकीय मदतीची आवश्यकता आहे. याचा सहानुभूतीने विचार करून शासनाने लोककलावंतांना मानधन वाढवून द्यावे, अशी मागणी धुमाळ यांनी या निवेदनात केली आहे.

## तरुणाला घरी बोलावून बेदम मारहाण : चौघांविरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** एका तरुणाला घरी बोलावून लाकडी दांडके, लोखंडी गज तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी चौघांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रवीण दत्तात्रय गुंड (वय ३७, रा. पोखर्डी, ता. जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दत्तात्रय जाधव, संभा दत्तात्रय जाधव, सुनिल सुसे व अक्षय सुनिल सुसे (सर्व रा. पोखर्डी, ता. जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जून रोजी सायंकाळी सुमारे ७.२० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी हे सुसेवस्ती येथील मैदानावर क्रिकेट खेळत असताना आरोपी दत्तात्रय जाधव यांनी त्यांना मोबाईलवर फोन करून पोखर्डी येथील घरी बोलावून घेतले. तेथे माझ्या भाचीला फोन का करतो? असा जाब विचारण्यात आला. यावेळी फिर्यादी यांनी तुम्ही समजता तसे काही नाही. ती मला फोन करते म्हणून मी तिला फोन करतो, असे सांगितल्याचा राग आल्याने आरोपींनी फिर्यादीस लाकडी दांडक्याने हात, पाय व पाठीवर मारहाण केली. त्यानंतर इतर आरोपींनी लोखंडी गज तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शहर स्वच्छता मोहिमेत नागरिकांनी सहभाग घ्यावा : महापौर गाडे

### छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून मनपाच्या स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरभर विशेष स्वच्छता अभियानाला प्रारंभ करण्यात आला. यापुढे प्रत्येक दहा दिवसांनी शहरातील विविध भागांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांनीही या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर ज्योती गाडे यांनी केले.

यावेळी महापौर ज्योती गाडे म्हणाल्या की, स्वच्छतेमुळे शहराचे सौंदर्य वाढतेच, शिवाय नागरिकांचे आरोग्यही सुदृढ आणि निरोगी राहण्यास मदत होते. आ. संग्राम जगताप हे शहर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी सातत्याने स्वतः रस्त्यावर उतरून स्वच्छता अभियानात सहभागी होत असून प्रशासनालाही वेळोवेळी आवश्यक सूचना देत असतात. स्वच्छ शहर घडविण्याची जबाबदारी केवळ महापालिकेची नसून प्रत्येक नागरिकाने आपल्या शहराची जबाबदारी समजून स्वच्छतेबाबत जागरूक राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.



छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या माध्यमातून सक्कर चौक येथे विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. महापौर ज्योती गाडे यांनी स्वतः हातात झाडू घेऊन परिसराची स्वच्छता करत अभियानाची सुरुवात केली.

यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, संपत बारस्कर, गणेश भोसले, प्रा. माणिकराव विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, महेश तवले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे, रेवन्नाथ पवार, गोरख पडोळे, सुरज कोतकर, जॉय लोखंडे, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, सुरज शिंदे, नितीन घोडके, तुषार यादव, मारुती पवार, भाऊ बारस्कर, सचिन पवार, रवी दंडी आदी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी संपत बारस्कर म्हणाले की, आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात व्यापक स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. संत गाडगेबाबा यांनी गावोगावी फिरून कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला आणि स्वतः हातात झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन नागरिकांनी स्वच्छतेबाबत पुढाकार घ्यावा. प्रत्येकाने आपला कचरा घंटागाडीतच टाकावा. काही नागरिक रस्त्याच्या कडेला कचरा टाकून कचऱ्याचे ढीग निर्माण करतात, ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. आपले शहर कचराकुंडीमुक्त झाले असल्यामुळे रस्त्यांवर कुठेही कचराकुंडी दिसणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

## कर्जत शहरात मोहरम उत्साहात

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कर्जत शहरात शुक्रवारी मोहरम सण उत्साहात साजरा करण्यात आला. कुरेशी मोहल्ला या ठिकाणाहून दुपारी २ वाजता इमाम हसन-हुसेन, बारा इमाम यांच्या सवारी मिरवणुकीस प्रारंभ झाला. शहरात अनेक ठिकाणी सर्वधर्म समभावचे अनोखे दर्शन पहावयास मिळाले. अनेक हिंदू बांधवांनी सवारी मिरवणुकीत चादर अर्पण करीत मनोभावे दर्शन घेतले. गुरुवारी कत्तलची रात्र असल्याने अनेक सवारी पहाटे पर्यंत मिरवणुकीसाठी बाहेर पडल्या होत्या. कर्जत शहरात शुक्रवारी मोहरम सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुवारी संध्याकाळी कत्तल की रात असल्याने मध्यरात्री कुरेशी मोहल्ला येथे इमाम हसन-हुसेन यांच्या सवारी सवाद्य बाहेर पडल्या होत्या. यावेळी अंगारमध्ये काही काळ सवारी फिरल्या. या हुसेनच्या नाऱ्याने वातावरण दुमदुमले होते. तर शुक्रवारी दुपारी जुम्माची नमाज अदा केल्यानंतर सर्व प्रमुख सवाऱ्या मिरवणुकीसाठी बाहेर पडल्या. यावेळी तरुणाईचा उत्साह वाखाण्याजोगा होता. शहरात ठीकठिकाणी सवाऱ्या दर्शनासाठी सर्व धर्मियांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी अनेक ठिकाणी प्रमुख सवाऱ्याना चादर अर्पण करण्यात आल्या.



## स्टेट बँक चौकात तरूणावर जीवघेणा हल्ला

**अहिल्यानगर :** शहरातील स्टेट बँक चौक परिसरात एका तरूणावर दोन अज्ञात व्यक्तींनी लाकडी काठी व लोखंडी गजाने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नामदेव अंबादास बडे हे २४ जून रोजी रात्री ११.३० वा. स्टेट बँक चौक येथून घरी जात होते. त्यावेळी दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांना थांब, थांब असे म्हणत शिवीगाळ केली. तसेच त्यांच्या दुचाकीसमोर स्वतःची गाडी आडवी लावून लाकडी काठीने पाठीवर व हातावर मारहाण केली. व त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत दमदाटी केली. तसेच एकाने लोखंडी गजाने डोक्यावर घाव घालुन त्यांना जखमी केले. जखमींवर जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. या प्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ पी. ए. बारगजे करीत आहेत.

## ग्रामीण विकास केंद्राचे कार्य आदर्शवत : स. पो. नि. राजपूत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**खर्डा :** ग्रामीण विकास केंद्र ही संस्था सतत समता आणि बंधुता या संवैधानिक मूल्यांवर आधारित काम करत आहे. महापुरुषांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी डीजे किंवा ढोल-ताशांचा अवाजवी वापर न करता,संविधान दिंडीसारखे प्रबोधनपर कार्यक्रम राबवून समाजात एकता टिकवण्याचे त्यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद असून, इतर संस्थांनीही याचा आदर्श घेतला पाहिजे,असे प्रतिपादन खर्डा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी केले.

दि. २६ जूनला खर्डा येथील मदारी वस्तीवर भटके विमुक्त आदिवासी पालावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त एका भव्य प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

शाहू महाराजांचे उपकार विसरता येणार नाहीत:- उमाताई जाधव

याप्रसंगी ग्रामीण विकास केंद्र संस्थेच्या सचिव उमाताई जाधव यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा गौरव केला.त्या म्हणाल्या, छत्रपती शाहू महाराज हे सर्व जाती-धर्माचे राजे होते. शाहू महाराजांनी भटके विमुक्त व आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना आडनावे दिली. जर त्यांनी ही क्रांती केली नसती, तर आजही लोक जातीच्या नावावरूनच ओळखले गेले असते. शाहू महाराजांचे हे उपकार समाज कधीही विसरू शकत नाही.

गोरगरिबांना न्याय देणारे राजे: बापू ओव्हाळ:- संस्थेचे संचालक बापू ओव्हाळ यांनी सांगितले की,छत्रपती शाहू महाराजांनी गरीब,कष्टकरी, आदिवासी आणि भटके विमुक्त समाजाला न्याय देण्यासाठी स्वतःपासून सुधारणांची सुरुवात केली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि गंगाराम कांबळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांनी त्यांना सतत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले,हा इतिहास प्रेरणादायी आहे.या प्रबोधन मेळाव्याला खर्डा ग्रामपंचायत च्या प्रशासक संजीवनीताई, सामाजिक कार्यकर्त्या सविताताई गोलेकर प्रामुख्याने उपस्थित होत्या. कार्यक्रमात शाहीर बाबासाहेब राजगुरू यांनी शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा व गीते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले व मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात विशाल पवार यांनी केलेल्या प्रास्ताविकाने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता इंगळे यांनी केले. अध्यक्षस्थानाची सूचना सलीम मदारी यांनी मांडली, तर त्याला उर्मिला कवडे यांनी अनुमोदन दिले. शेवटी मंगल शिंगाणे यांनी सर्वांचे आभार मानले. या मेळाव्याला ऋषिकेश गायकवाड, लखुपती गोलेकर ,सुनिताताई, सरदार मदारी, सलीम मदारी, हुसेन मदारी, फकीर मदारी, मुस्तफा मदारी, सुनिता काळे यांच्यासह वस्तीवरील नागरिक उपस्थित होते.

## रेणुका देवी विद्यालयात शालेय साहित्य वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रेणुका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव पिसा येथे गावचे सुपुत्र व उद्योजक गोरख भालके यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमास विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास डॉ. प्रणोती राहुल जगताप-पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब पांडुरंग मुठे होते. त्यानंतर विद्यार्थ्यांना शालेय बॅग,स्टेशनरी साहित्याचे वितरण करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने सहज उपलब्ध व्हावीत आणि त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमास वीर शालन रामा, अशोक अण्णा गायकवाड, प्रसाद सुधाकर शिंदे, दिलीप लक्ष्मण ननवरे, बाळासाहेब महादेव मांडगे, शशिकांत शांताराम उबाळे, शहाजी अण्णासाहेब भापकर, शाम लक्ष्मण घेगडे, संदीप विकास बोबडे, महेश शहाजी पाडळे, अविनाश बाबासाहेब मांडगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विद्यालयाच्या शिक्षकांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.



## खर्डा येथील जुनेद सय्यद एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण, ग्रामस्थांकडून सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**खर्डा :** येथील जावेद भाई सय्यद यांचे चिरंजीव व खर्डा गावचे माजी सरपंच व जय महाराष्ट्र फायर वर्क्स चे संचालक मंजूर भाई सय्यद यांचे पुतणे जुनेद सय्यद याने एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण केली असून त्याचे खर्डा व जामखेड तालुक्यातून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे व त्याचे कौतुक केले जात आहे.

जुनेद याचे प्राथमिक शिक्षण व उच्च माध्यमिक शिक्षण अहिल्यानगर येथे झाले त्याचे वडील जावेदभाई सय्यद हे सिव्हिल इंजिनियर आहेत जुनेद आपल्या बुद्धी कौशल्याच्या जोरावर शिक्षण घेतले व त्याचा एमबीबीएसला सोलापूर येथे नंबर लागला तो आज एमबीबीएस परीक्षा उत्तीर्ण झाला आहे सय्यद घराणे हे शोभेची दारू बनवण्याचा मोठा उद्योग समूह आहे. परंतु जुनेद याने आपण शैक्षणिक क्षेत्रात जाऊन एमबीबीएस च्या माध्यमातून डॉक्टर ही पदवी मिळवायची हे ध्येय समोर ठेवून त्याने रात्रीचा एक दिवस करून अभ्यास केला व त्याचे फळ सय्यद घराण्याला एमबीबीएस उत्तीर्ण झाल्यामुळे मिळत आहे. सय्यद घराणे घराणा मोठा असून पहिल्यांदाच त्यांच्या घराण्यात एमबीबीएस पदवी मिळाली आहे जुनेद सय्यद याचे खर्डा व जामखेड, अहिल्यानगर, बीड जिल्ह्यातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## खडांबेत राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात साजरी करण्यात आली.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी अशोक उंडे, सुरसिंग पवार, बाळासाहेब लटक, यशवंत ताकटे, श्याम खेसम्हाळसकर, इंजि. मच्छिंद्र सोनवणे, बाळासाहेब जठार, अनशाबापू आवारे, भाऊसाहेब खळेकर, अर्जुनराव खळेकर, केरू कल्हापुरे, गुलाब पवार, बाळासाहेब कल्हापुरे, भानुदास कल्हापुरे, दादा पाटील काचोळे, अमोल हरिश्चंद्रे व अनिल कल्हापुरे उपस्थित होते.

जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा आणि शैक्षणिक क्रांतीवर आधारित भाषणे सादर केली. यावेळी विद्यालयाचे प्रा. आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचे पुरस्कर्ते होते.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गदा?

### विशेष शिक्षकांना बी.एल.ओ. कामावर पाठवल्याने संताप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागातील केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांना बीएलओ (ईींह ड्र्शींशश्र जषषळलशी) तसेच इतर अशैक्षणिक कामांवर नियुक्त करण्यात आल्याने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारांवर गदा येत असल्याचा गंभीर आरोप 'केंद्र विशेष शिक्षक सेल, अहिल्यानगर' च्या वतीने करण्यात आला आहे. या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून विशेष शिक्षकांना अशैक्षणिक कामांतून मुक्त करण्यात यावे, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष उमेश शिंदे यांनी केली आहे.

यासंदर्भात दिव्यांग कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष, शिक्षण आयुक्त, राज्य व जिल्हास्तरीय शिक्षण अधिकारी तसेच संबंधित प्रशासनाकडे सविस्तर निवेदन दिले आहे. निवेदनात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ पावले उचलण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ (ठझुऊ -लीं) आणि शिक्षणाचा हक्क कायदा २००९ (ठढए -लीं) यांच्या तरतुदींनुसार प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्याला विशेष शिक्षण, थेरपी, समुपदेशन तसेच आवश्यक शैक्षणिक सहाय्य उपलब्ध करून देणे ही शासनाची कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र, अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागातील एकूण २४ केंद्रस्तरीय विशेष शिक्षकांपैकी तब्बल १६ शिक्षकांची मतदार



यादी विशेष पुनरीक्षण मोहिमेसाठी बीएलओ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एक महिना त्यांच्या अनुपस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार आहे .

निवेदनात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचाही उल्लेख करण्यात आला असून, विशेष शिक्षकांची नियुक्ती ही केवळ दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांच्यावर बीएलओसारखी अतिरिक्त जबाबदारी सोपविणे हे न्यायालयीन निर्देशांच्या विरोधात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेने पुढे म्हटले आहे की, विशेष शिक्षकांना वारंवार अशैक्षणिक कामांवर पाठविल्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणात मोठा अडथळा निर्माण होत आहे. काही ठिकाणी सामान्य शाळेत शिक्षक नसल्यास तिथे ही विशेष शिक्षकांना सक्तीने थांबविले जाते. एकंदरीत मनमानीपणे विशेष शिक्षकांचा वापर केला जात असून. स्थानीय अधिकाऱ्यांकडून सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि कायदे यांना हरताळ फासेल जात आहे .अशा बेकायदेशीर कामकाजावर तात्काळ बंदी आणावी असे निवेदनात म्हटले आहे.परीक्षा कालावधीत आवश्यक मार्गदर्शन मिळत नसल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. अनेक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अध्यापन आणि पुनर्वसन सेवा वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर विपरीत परिणाम होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

द•ख•ल

## भारतीय स्टेट बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त नेवासा शाखेत ग्राहकांचे रक्तदान

**नेवासा :** भारतीय स्टेट बँकेच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त नेवासा येथे येथील शाखेमध्ये बुधवार दि.२५ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ग्राहकांनी रक्तदान करून प्रतिसाद मिळाला. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिर प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ केंदळे,प्रगतशील शेतकरी हनुमंतराव वाकचौरे,बँकेचे गोल्ड व्हॅल्यूयर कृष्णा डहाळे,शिवसहकार सेनेचे



राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके,वृक्षमित्र अमृत फिरोदिया,सरपंच प्रकाश सोनटक्के,नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी भारतीय स्टेट बँकेचे नेवासा शाखा प्रबंधक रणजित नाळे यांनी आलेल्या ग्राहक व रक्त दात्यांचे स्वागत करत प्रास्ताविक केले बँकेची स्थापना १९५५ ला झाल्यानंतर उपेक्षित ग्राहक केंद्रबिंदू मानून बँकेने आजपर्यंत सेवा केली आज ही तत्पर सेवा देण्याचे काम आम्ही सर्व स्टाफ करत राहू अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली. यावेळी बालेंद्र पोतदार यांनी आपल्या जीवनातील पन्नासावे तर सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके यांनी आपले यांनी ७५ वे रक्तदान केल्याबद्दल त्यांचा शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी बँकेचे उपप्रबंधक राकेश कुकटला,विनोद चव्हाण,कॅशियर संदीप दुधाळे,विशाल आदिक,रुपाली काळे,दीपक गायकवाड,छोटू जिरे यांच्यासह बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संगमनेर येथील अर्पण ब्लड बँकेचे श्रीमती प्रमिला कडलग यांच्या मार्गदर्शनाखाली टेक्निशियन श्रध्दा जोगदंड,समीक्षा पडोळे, वैभवी भोयर,दर्शन पडोळे यांनी रक्तदात्यांची तपासणी केली तर रक्तदान करणाऱ्या दात्यांचा यावेळी भेटवस्तू देऊन शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट सचिवपदी सचिन भांडवलकर



**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील करंजे देऊळवाडी येथील सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट सचिव पदी सचिन सतीश भांडवलकर यांची नुकतीच निवड गुरुवार दि २५ रोजी देवस्थान ट्रस्ट ऑफिसमध्ये झाली.अगोदरचे सचिव विपुल विलास भांडवलकर यांनी ठरलेल्या वेळेत राजीनामा दिल्याने व सचिव पदासाठी सचिन सतीश भांडवलकर यांचा एकमेव अर्ज असल्याने ही निवड झाली अध्यक्षस्थानी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी होते . याप्रसंगी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंतराव वामनराव मोकाशी विद्यमान विश्वस्त विपुल विलास भांडवलकर ,मोहन मुरलीधर भांडवलकर , प्रताप मारुती भांडवलकर,अक्षय बाळासाहेब भांडवलकर ,प्रदीप बबन भांडवलकर राजेंद्र अरुणराव भांडवलकर ,संतोष पंढरीनाथ भांडवलकर ,सुनील बबन भांडवलकर ,रामदास बबन भांडवलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## खा. संजय दिना पाटील यांचा मंचर येथे निषेध

**निरगुडसर :** खा. संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी कथित गैरवर्तन करून शिवीगाळ व जोडे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेचा आंबेगाव तालुका पत्रकार संघाने तीव्र निषेध व्यक्त केला. या घटनेच्या निषेधार्थ संघाच्या वतीने मंचर येथील प्रांत कार्यालयात शुक्रवारी (ता.२६) नायब तहसीलदार सचिन मुंडे यांना निवेदन दिले. यावेळी जेष्ठ पत्रकार डी. के. वळसे पाटील, आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील,



उपाध्यक्ष नीलेश काण्णव, सचिव चंद्रकांत घोडेकर, सोशल मिडिया अध्यक्ष सचिन तोडकर, सुदाम बिडकर, जयेश शहा, अविनाश पवार, सीताराम काळे, विवेक शिंदे, रवींद्र वाळके, लक्ष्मण ढोबळे, विशाल करंडे, मोसीन काठेवाडी, मिलिंद भांगरे, निवेदक निलेश पडवळ उपस्थित होते. यावेळी जेष्ठ पत्रकार डी. के. वळसे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पत्रकारांसमवेत नेहमीच आदरपूर्वक संवाद असतो. त्यांनी बेताल वक्तव्य करणारे संजय पाटील यांना योग्य शब्दात समज देण्याची गरज आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांशी अशा प्रकारचे वर्तन अयोग्य असून यामुळे प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर आघात होत आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कारवाई करावी. पत्रकारांना निर्भय वातावरणात काम करता यावे आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात असेही ते म्हणाले.

# श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासाठी शासन सकारात्मक

## संस्थानच्या मागण्यांवर योग्य निर्णय घेणार : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज श्रीक्षेत्र आळंदी येथे भेट देऊन संत ज्ञानेश्वर माउलींच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी माउलींच्या चरणी राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीचे आणि सर्वांगीण विकासाचे साकडे घातले.

दर्शनानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या विश्वस्तांसोबत बैठक घेऊन संस्थानच्या विविध कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी विश्वस्तांनी श्रीक्षेत्र आळंदीच्या विकासासंदर्भातील विविध प्रस्ताव, भाविकांसाठी आवश्यक सुविधा, पायाभूत विकासकामे तसेच संस्थानसमोरील विविध प्रलंबित प्रश्न मांडले. या संदर्भातील सविस्तर निवेदनही संस्थानच्या वतीने त्यांना सादर करण्यात आले.

निवेदनातील मागण्या आणि विविध विषयांवर शासन स्तरावर सकारात्मक विचार करण्यात येईल. संबंधित विभागांशी समन्वय साधून योग्य तो निर्णय घेतला जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी दिली. श्रीक्षेत्र आळंदी हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असून येथे येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर दर्शन बारी चा विषय मागील १२ वर्षापासून प्रलंबित आहे तो लवकर मार्गी लावण्या बाबत ग्वाही दिली.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार दिलीप वळसे पाटील, माजी आमदार दिलीप मोहिते, आळंदी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, तसेच आजी-माजी पदाधिकारी, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर लोंढे, पुरुषोत्तम पाटील, ॲड.रोहिणी पवार, वारकरी संप्रदायातील मान्यवर तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



## भारतीय स्टेट बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त नेवासा शाखेत ग्राहकांचे रक्तदान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** भारतीय स्टेट बँकेच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्त नेवासा येथे येथील शाखेमध्ये बुधवार दि.२५ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ग्राहकांनी रक्तदान करून प्रतिसाद मिळाला. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिर प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ केंदळे,प्रगतशील शेतकरी हनुमंतराव वाकचौरे,बँकेचे गोल्ड व्हॅल्यूयर कृष्णा डहाळे,शिवसहकार सेनेचे राज्य उपप्रमुख बालेंद्र पोतदार,सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके,वृक्षमित्र अमृत फिरोदिया,सरपंच प्रकाश सोनटक्के,नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.यावेळी भारतीय स्टेट बँकेचे नेवासा शाखा प्रबंधक रणजित नाळे यांनी आलेल्या ग्राहक व रक्त दात्यांचे स्वागत करत प्रास्ताविक केले बँकेची स्थापना १९५५ ला झाल्यानंतर उपेक्षित ग्राहक केंद्रबिंदू मानून बँकेने आजपर्यंत सेवा केली आज ही तत्पर सेवा देण्याचे काम आम्ही सर्व स्टाफ करत राहू अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली. यावेळी बालेंद्र पोतदार यांनी आपल्या जीवनातील पन्नासावे तर सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके यांनी आपले यांनी ७५ वे रक्तदान केल्याबद्दल त्यांचा शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.यावेळी बँकेचे उपप्रबंधक राकेश कुकटला,विनोद चव्हाण,कॅशियर संदीप दुधाळे,विशाल आदिक,रुपाली काळे,दीपक गायकवाड,छोटू जिरे यांच्यासह बँकेचे ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संगमनेर येथील अर्पण ब्लड बँकेचे श्रीमती प्रमिला कडलग यांच्या मार्गदर्शनाखाली टेक्निशियन श्रध्दा जोगदंड,समीक्षा पडोळे, वैभवी भोयर,दर्शन पडोळे यांनी रक्तदात्यांची तपासणी केली तर रक्तदान करणाऱ्या दात्यांचा यावेळी भेटवस्तू देऊन शाखा प्रबंधक रणजित नाळे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.



## खबरदार जर अल्पवयीन मुलांना दुचाकी द्याल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोमेश्वरनगर** -बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर ठाण्यांतर्गत कठीण पूल कोऱ्हाळे,वडगाव निंबाळकर सोमेश्वरनगर ,वाकी, चोपडज ,पळशी ,मुरटी, मुरूम वानेवाडी या परिसरात शाळा महाविद्यालय आहेत सोमेश्वरनगर हे मुख्य बाजारपेठ सह मोठे शिक्षण संकुलन असल्याकारणाने विद्यार्थी संख्या जास्त आहे पालकांनी आपल्या अल्पवयीन शिकत असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दुचाकी वाहन देऊ नये असे वडगांव निंबाळकर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांनी गुरुवारी दिनांक २५ रोजी वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशन येथे घेतलेल्या पत्रकार परिषद सांगितले तसेच जड वाहतूक करणारे वाहने त्यांनी आपल्या वाहनांचा वेग मार्गावर आलेल्या प्रत्येक गावामध्ये दिलेल्या नियमांचे पालन करत ठेवावा. गाड्यांना असलेले ब्लॅक फिल्मिंग ,फॅन्सी नंबर प्लेट बसणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा केली जाईल त्याचप्रमाणे ११२ वर चुकीचे फसवे कॉल करू नये असेही त्यांनी बोलताना सांगितले.वडगा निंबाळकर पोलीस स्टेशन हद्दीत कोणत्याही गैरप्रकार ,११२ चुकीचा कॉल, अल्पवयीन मुलांना दुचाकी न देणे, अवैद्य धंदे खपवून घेतले जाणार नाही. ए.पी.आय जीवन मोहिते

## गुन्हा करण्याच्या उद्देशाने दबा धरून बसलेला इसम ताब्यात ब्रेझा कारसह मिरची पूड हस्तगत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा, :** श्रीगोंदा शहरात रात्री गस्त घालत असताना संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या ब्रेझा कारमधून मिरची पावडर आढळून आल्याने पोलिसांनी एका संशयित इसमाला ताब्यात घेतले आहे. महेंद्र गंडीच्या काळे राहणार घालवडी तालुका कर्जत असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २६) रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास श्रीगोंदा शहरातील बसस्थानकाजवळील साळवणदेवी रोड परिसरात पांढ्या रंगाची मारुती सुझुकी ब्रेझा (क्र. एमएच १७ सीएम ५८५८) संशयास्पद स्थितीत उभी असल्याचे गस्त पथकाच्या निदर्शनास आले. वाहनाजवळील इसमाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असता त्याने आपले नाव महेंद्र गंडीच्या काळे (रा. धालवडी, ता. कर्जत) असे सांगितले.मात्र, त्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबत तो कोणतेही समाधानकारक कारण सांगू शकला नाही. वाहनाची झडती घेतली असता प्लास्टिकच्या पिशवीत बांधलेली मिरची पावडर आढळून आली. याबाबतही त्याने संयुक्तिक स्पष्टीकरण दिले नसल्याने तो दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयास्पदरीत्या वावरत असल्याचा संशय पोलिसांना आला.याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६२८/२०२६ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ अन्वये नोंद करण्यात आला असून पोहेकॉ. आप्पा तरटे पुढील तपास करीत आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी रुपेशकुमार क्षिरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक गणेश अहिरे तसेच गस्त पथकाने केली.

## भारतीय पत्रकार संघाच्या वतीने खा. संजय दिना यांचा जाहीर निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** संजय दिना पाटील यांनी अत्यंत अश्लाघ्य शब्दांत पत्रकारांशी भाषा केली असून त्यांना जीवे मारण्याची धमकी देखील दिली आहे. याचा पत्रकारांनी संताप व्यक्त केला आहे. यासाठी आता राज्यभरातील पत्रकार एकवटे असून बारामती तालुक्यातील भारतीय पत्रकार संघ वतीने खासदार संजय दिवा पाटील यांचा जाहीर निषेध करत वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आशियाचे निवेदन वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक जीवन मोहिते यांच्याकडे देण्यात आले आहे. याप्रसंगी भारतीय पत्रकार संघ मधुकर बनसोडे ,कार्याध्यक्ष विनोद गोलांडे,जिल्हा सचिव काशिनाथ पिंगळे, संघटक मोहम्मद शेख ,हल्ला कृती समिती अजय पिसाळ, पत्रकार फिरोज भालदार, सोमनाथ जाधव आधी पत्रकार बांधव उपस्थित होते.



## खा. संजय दिना पाटील यांच्यावर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** मुंबई ईशान्य मतदारसंघाचे खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत, या घटनेचा निषेध नोंदवत कोपरगाव तालुका मराठी पत्रकार संघ, कोपरगाव तालुका इलेक्ट्रॉनिक पत्रकार संघ तसेच तालुक्यातील पत्रकारांनी शुक्रवारी कोपरगाव तहसील कार्यालय आणि कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात निवेदन सादर केले.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की , पत्रकारांनी प्रतिक्रिया विचारल्याचा राग मनात धरून खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. हा प्रकार अत्यंत निंदनीय असून पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारा तसेच त्यांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारा आहे.या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित खासदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यावेळी कोपरगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष युसुफ रंगरेज, उपाध्यक्ष शैलेश शिंदे, संस्थापक अध्यक्ष सोमनाथ सोनपसारे, मोबीन खान, शंकर दुपारगुडे, सिद्धार्थ मेहेरखांब,शाम गवंडी, योगेश डोखे, संतोष जाधव, अनिल दीक्षित, सुनील ससाने, रवी जगताप यांच्यासह तालुक्यातील अनेक पत्रकार उपस्थित होते.

# बिबट मादी पिंजऱ्यात जेरबंद

## ग्रामस्थांनी सोडला सुटकेचा निश्वास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती (ता. आंबेगाव) :** वळती गावाच्या पूर्वेकडील घोठेमाळ परिसरात शुक्रवारी (दि. २६) पहाटे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्याची मादी जेरबंद करण्यात यश आले. मागील दोन महिन्यांपासून परिसरात बिबट्यांचा वाढता वावर असल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर बिबट्याची मादी पिंजऱ्यात अडकल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

वळती गावातील शेतकरी सुनिल बाबुराव डुकरे यांच्या घोठेमाळ येथील शेतात वनविभागाने पिंजरा उभारला होता. शुक्रवारी सकाळी ते शेतात गेले असता पिंजऱ्यात बिबट्याची मादी अडकल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ ही माहिती गावातील धोंडीभाऊ भोर यांना दिली. त्यानंतर वनविभागाशी संपर्क साधून घटनेची माहिती देण्यात आली.

मंचर वन विभागाचे वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले व वनपरिमंडल अधिकारी आर. एम. फुलमाळी यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक बालाजी पोतरे व रेस्क्यू टीम सदस्य व बेस कॅम्प कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. आवश्यक खबरदारी घेत बिबट्याच्या मादीला सुरक्षित ताब्यात घेण्यात आले.

वनविभागाच्या माहितीनुसार, पकडलेल्या बिबट्याच्या मादीची वैद्यकीय तपासणी करून तिला जुन्नर तालुक्यातील माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात येणार आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी एकटे शेतात जाऊ नये, लहान मुलांवर लक्ष ठेवावे तसेच जनावरांची सुरक्षित व्यवस्था करावी, असे आवाहन वनपरिक्षेत्राधिकारी विकास भोसले यांनी केले आहे.जर ही बातमी प्रत्यक्षात बछडा पकडल्याची असेल, तर मथळा ''वळती येथे बिबट्याचा बछडा पिंजऱ्यात जेरबंद'' असा ठेवणे अधिक योग्य ठरेल.



## हुमणी किड नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्याचा वापर फायदेशीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव :** हुमणी किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सिध्देश ढवळे यांनी केले आहे. यासाठी शेतकरी सुभाष गोरडे यांच्या शेतात प्रकाश सापळा उभारून त्याचे प्रात्यक्षिक सादर करत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. पहिल्या पावसानंतर हुमणीचे प्रौढ भुंगेरे मोठ्या प्रमाणात जमिनीतून बाहेर पडतात व प्रकाशाकडे आकर्षित होतात. या कालावधीत प्रकाश सापळ्यांच्या साहाय्याने भुंगेऱ्यांचे संकलन केल्यास त्यांची संख्या कमी होऊन पुढील काळातील हुमणीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यास मोठी मदत होते. हा उपाय कमी खर्चिक, पर्यावरणपुरक आणि प्रभावी असतो. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी प्रमोद भोर यांनी घरगुती बियाण्याची उगवण क्षमता, बीज प्रक्रिया , बीबीएफ,एल निनो आणि महाडीबीटी अंतर्गत एससी, एसटी व सर्वसाधारण शेतकऱ्यांनी अर्ज करावे या विषयी माहिती दिली. सदर मोहिमेदरम्यान मंडळ कृषी अधिकारी प्रसन्न जाधव, उपकृषी अधिकारी अरुण जोरी, सहाय्यक कृषी अधिकारी सचिन जाधव. आणि परिसरातील शेतकरी, विनायक गोरडे, समीर गोरडे, किशोर गोरडे, प्रवीण गोरडे, संतोष गोरडे, अतुल गोरडे, सुशीला गोरडे उपस्थित होते.



# २१.७० लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## सासवड पोलिसांची धडक कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** सासवड पोलिसांनी मौजे बोपगाव (ता. पुरंदर) येथील कानिफनाथ गडाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका गोदामावर धाड टाकून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पान मसाला व सुगंधी तंबाखूचा तब्बल २१ लाख ७० हजार ९६० रुपयांचा साठा जप्त केला. या प्रकरणी एका संशयिताविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



सासवड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील व कारवाईतील पथक जप्त केलेल्या प्रतिबंधित गुटख्याच्या मुद्देमालासह.

पोलिसांना २५ जून रोजी दुपारी सुमारे १.२५ वाजता गोपनीय बातमीदारामार्फत बोपगाव येथील एका गोदामात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा असल्याची माहिती मिळाली. वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तत्काळ छापा टाकला. तपासणीदरम्यान 'सिग्निचर फिनेस्ट' पान मसाला, 'ॲक्शन-७' कंपनीची सुगंधी तंबाखू, 'सम्राट' पान मसाला तसेच 'एस.टी.-१' कंपनीची सुगंधी तंबाखू असा विविध कंपन्यांचा प्रतिबंधित माल आढळून आला. पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी पोलीस शिपाई प्रणय राजेंद्र मखरे यांच्या फिर्यादीवरून सिराज शेख (रा. शितल पेट्रोल पंपाशेजारी, कोंढवा खुर्द, पुणे) याच्याविरुद्ध सासवड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९२/२०२६ नोंद करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ आणि अन्न सुरक्षा नियम २०११ मधील विविध तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील करीत आहेत.

हीकारवाईपुणेग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिराजदार, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष घोळवे, पोलिस उपनिरीक्षक अर्चना पाटील व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# पेमगिरी, कोठे बुद्रुक व कुरकुंडी आरोग्य उपकेंद्रांसाठी पदस्थापनेला मंजुरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आमदार अमोल खताळ यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. तालुक्यातील पेमगिरी , कुरकुंडी व कोठे बुद्रुक येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी नवीन पदस्थापना निर्मितीस राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक दर्जेदार, तत्पर आणि प्रभावी आरोग्य सेवा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला असून आरोग्य यंत्रणेची कार्यक्षमता वाढण्यास मोठी मदत होणार आहे.



याबाबत आ. अमोल खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यशासनाने ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम पूर्ण झालेल्या नवनिर्मित तसेच श्रेणीवर्धित प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत तालुक्यातील पेमगिरी,कुरकुंडी व कोठे बुद्रुक आणि या उपकेंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

आ. खताळ यांनी या तीनही आरोग्य उपकेंद्रांमध्ये आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा मिळण्यात येणाऱ्या अडचणी, वाढती लोकसंख्या आणि आरोग्य सुविधांची गरज याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले होते. निवेदन दिल्यानंतरही त्यांनी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करत शासन स्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला.

आ. खताळ यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करत आरोग्यमंत्री आबिटकर यांनी राज्यातील विविध प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांसाठी पदनिर्मितीला मंजुरी दिली. त्यामध्ये तालुक्यातील पेमगिरी १५ ,कुरकुंडी ४ व कोठे बुद्रुक ४ अशाप्रकारे तीन उपकेंद्रांचा समावेश करण्यात आला आहे. मंजूर करण्यात आलेल्या पदांमध्ये वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सहाय्यक परिचारिका, औषध निर्माता, कनिष्ठ लिपिक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्त्री आरोग्य सहाय्यक, पुरुष आरोग्य सहाय्यक, परिचर, वाहनचालक तसेच सफाईगार आदी पदांचा समावेश आहे. या पदांच्या भरतीमुळे आरोग्य उपकेंद्रांमध्ये आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणार असून रुग्णांना विविध सेवा एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार आहे.

द•ख•ल

## मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर : नगरसेवक रोकडे

**शेवगाव :** सर्वच राजकारणी निवडणुकीत दिलेला शब्द पाळतातच असे नाही. मात्र, शेवगाव नगरपरिषदेचे युवा नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते निलेश रोकडे यांनी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर



शासकीय निधीची वाट न पाहता शब्द प्रमाण मानून स्वखर्चातून प्रभाग क्रमांक ८ मध्ये अत्यावश्यक मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिल्याने ते कौतुकास पात्र ठरले आहेत. नगरसेवक रोकडे यांनी स्वखर्चातून नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्याने नागरिकास समाधान व्यक्त होत आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये नेवासा रोड, प्रोफेसर कॉलनी, पवार वस्ती, गणेश नगर, घुले कॉलनी, इरिगेशन कॉलनी, आरे वस्ती, लांडे वस्ती तसेच परदेशी वस्तीचा समावेश आहे. या प्रभागातील मतदारांना त्यांनी निवडणुकीदरम्यान मूलभूत नागरी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, पावसाळा तोंडावर असल्याने त्यांनी शासकीय निधीची वाट न पाहता रस्ते, पाणी, वीज व आरोग्य ही कामे स्वखर्चातून करण्यास प्राधान्य दिले आहे. विशेषतः जेष्ठ नागरिकांना विरंगुळ्यासाठी ५१ बाके उपलब्ध करून दिली आहेत तसेच अपघात टाळण्यासाठी बहिर्वक्र आरसा बसवला आहे. नगरसेवक नव्हे तर, जनसेवक म्हणून यापुढेही लोकपयोगी कामे केली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## ना. विखे पाटील व आ. दाते यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात जलसंधारण कामांना प्राधान्य



**जवळा :** राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात जलसंधारण कामांना प्राधान्य देण्यात येत असून पारनेर तालुक्यातील बहुतांश भाग पाण्याखाली येत असल्याने तालुका दुष्काळमुक्त होईल असे प्रतिपादन घोड कुकडी कालवा सल्लागार समितीचे सदस्य तथा वितरिका स्तरीय पाणीवापर संस्था महासंघाचे कार्याध्यक्ष प्रकाश वायसे यांनी व्यक्त केले आहे. ना. विखे व आ. दाते यांच्या माध्यमातून जवळा येथील कुकडी डावा कालवा अंतर्गत वितरिका क्रमांक ४/५ दुरुस्तीच्या कामाचा शुभारंभ वायसे, दिलीप मदगे, पांडुरंग ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून यामुळे शेकडो हेक्टर शेतीला पाणी उपलब्ध होणार आहे. यावेळी अधिकारी संजय बोरुडे, अरुण सोमवंशी तसेच जवळा गुणोरे, गाडीलगाव, राळेगण थेरपाळ, म्हसे, कोहकडी या भागातील शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप मदगे यांनी केले शेवटी पांडुरंग ढवळे यांनी आभार मानले.

## मोहोज येथे कापूस लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न



**करंजी :** कृषी विभाग, पाथर्डी यांच्या वतीने कपास कांती योजनेअंतर्गत मोहोज खुर्द येथे कछ्झड व तंत्रज्ञान विषयक शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास परिसरातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कापूस सुधार प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार भुते उपस्थित होते. त्यांनी कछ्झड व उश्रीशी डरलिळपस तंत्रज्ञानाचे महत्त्व, शिफारस केलेले वाण, संतुलित खत व पाणी व्यवस्थापन, वाढ नियंत्रकांचा वापर तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक सुखदेव वांढेकर गुरुजी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक कृषी अधिकारी राहुल आठरे यांनी केले. यावेळी मंडळ कृषी अधिकारी संकेत कराळे, उपकृषी अधिकारी बाळासाहेब काकडे तसेच करंजी मंडळातील कृषी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषीदर्शनीचे वाटप करण्यात आले. आभार संपत वांढेकर यांनी मानले. उपस्थित शेतकऱ्यांनी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरल्याची भावना व्यक्त केली.

## शेवगावचे रस्ते खड्डेमय सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**शेवगाव :** आदरा नक्षत्राच्या पावसाने गेल्या दोन दिवसापासून शेवगाव मध्ये हजेरी लावली. पाऊस पडून जाताच शेवगाव शहरातील रस्त्याची दयनीय अवस्था बघायला मिळाली. रस्त्यात खड्डे की खड्ड्यात



रस्ते असाच माहोल सध्या शेवगाव शहरात बघायला मिळत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष मात्र या ठिकाणी झालेले दिसते. रस्त्यामधील खड्डे कोण बुजवणार अशी चर्चा शेवगाव मध्ये रंगू लागले आहे. शेवगाव शहरातून अहिल्यानगर, पांढरी पूल, पाथर्डी, नेवासा,संभाजीनगर,गेवराई आदी मुख्य शहरांना जोडणारे रस्ते असल्याने कायम वाहनांची वर्दळ असते. मढी, मोहटादेवी,मायंबा या देवस्थानांना दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच तिसगाव ते शेंद्रा हा चार पदरी रस्त्याचे कामही सध्या धीम्या गतीने सुरू असून त्याचाही फटका वाहनधारकांना बसत आहे. त्यातच शहरातील रस्त्यांची अवस्था दयनीय झाल्याने पादचाऱ्यांसह वाहन चालक ही बेजार झाले आहे. खड्ड्यामध्ये गाडी आढळून काही गाड्यांचे अपघातही झाले त्यात दुचाकीस्वार जखमी झाल्याच्याही घटना घडत आहेत. मात्र सार्वजनिक बांधकाम खाते साधा मुरूमही त्या खड्ड्यात टाकायला धजावत नसल्याने नेमके रस्ते दुरुस्त कोण करणार हे अनुत्तरित आहे. रस्त्यावरील खड्डे तत्काळ बुजवण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांतून होत आहे. याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम खात्याचे अभियंता प्रल्हाद पाठक यांना विचारले असता त्यांनी आपण बैठकीत असल्याचे सांगून उत्तर देण्याचे टाळले.

# एकनाथवाडीच्या जांबुळवाडी शाळेला कुलूप

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान ; शेतकऱ्याच्या नाराजीचा फटका चिमुकल्यांना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार :** नवीन शैक्षणिक वर्ष दिनांक १५ जून २०२६ रोजी सुरू झाले. नवीन गणवेश, दप्तर, बूट घालून आलेल्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. मात्र मौजे एकनाथवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभुळवाडीला सकाळी १०:०० वाजता कुलूप लागल्याचे समोर आले आहे शाळेच्या दाराला कुलूप लावून शेतकऱ्याने निषेध नोंदवला.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गट नं. ५३७ मधील जि.प. शाळा जांभुळवाडी इ.स. २००० साली स्थापन झाली. शाळेच्या इमारतीसाठी दिलेल्या जागेचा मोबदला आज २५ वर्षे झाली तरी शेतकऱ्यास मिळालेला नाही. यापूर्वी मोबदल्यासाठी ३ दिवस उपोषण केल्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी गायगोठा व विहीर मंजूर करतो असे लेखी आश्वासन दिले होते. परंतु आज पर्यंत कोणत्याही योजनेचा मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्याने नाराजी व्यक्त करत शाळेला कुलूप लावले.

**विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात**

या प्रकारामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. पालकांमध्येही तीव्र नाराजी



आहे. स्थानिक प्रशासन, गटशिक्षण अधिकारी, गटविकास अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी. शेतकऱ्याचा मोबदल्याचा प्रश्न आणि विद्यार्थ्यांचे शिक्षण या दोन्ही बाबींवर त्वरित तोडगा काढावा, अशी गावकऱ्यांची मागणी आहे.

ग्रामस्थांनी इशारा दिला आहे की, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने व जबाबदारीने कार्यवाही करणे गरजेचे आहे. अन्यथा शाळा सुरू होईपर्यंत तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

**अंगणवाडी भरतीचा मुद्दाही ऐरणीवर**

एकनाथवाडी येथील अंगणवाडी मदतनीस पदभरतीतही राजकीय हस्तक्षेप करून नियम डावलले गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अपंग महिलेकडे आरक्षणासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले असून तक्रार अर्ज देऊनही प्रशासनाने दखल घेतली नाही. अर्जदार सुदाम नामदेव खेडकर यांच्या सून सौ. भाग्यश्री खेडकर ह्या अपंग असूनही त्यांना संधी नाकारण्यात आली. एकनाथवाडी गावात शाळेचा मोबदला आणि अंगणवाडी भरती या दोन्ही मुद्द्यांमुळे प्रशासनाविरोधात असंतोष आहे. एका महिन्याच्या आत दोन्ही प्रश्न निकाली निघाले नाहीत तर मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, महसूल मंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## शेवगावच्या विकासासाठी उपमुख्यमंत्र्याकडे निधीची मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** शिवसेना नेते अरुण मुंढे यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन शेवगाव शहराच्या सर्वांगीण विकासासंदर्भातील विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी राज्याचे कॅबिनेट मंत्री दादाजी भुसे उपस्थित होते.

या भेटीत शेवगाव शहरातील प्रलंबित विकासकामे, पायाभूत सुविधांचा विस्तार, नागरिकांसाठी आवश्यक सुविधा तसेच शहराच्या विकास आराखड्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आदी मूलभूत सुविधांसाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.शहरातील व्यापारी, उद्योजक आणि नागरिकांच्या सोयीसाठी आधुनिक व्यापारी संकुल उभारण्यासाठी



आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदनही उपमुख्यमंत्री शिंदे यांना सादर करण्यात आले. या प्रस्तावावर सकारात्मक चर्चा झाली असून आवश्यक सहकार्य करण्याबाबत आश्वासन मिळाल्याचा दावा अरुण मुंढे यांनी केला. शेवगावच्या विकासासाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करून घेणे, नवीन विकास प्रकल्पांना मंजुरी मिळविणे आणि विविध विकासकामांना गती देण्यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असे अरुण मुंढे यांनी सांगितले.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात तरुणांनी घेतली नशा मुक्तीची शपथ



**लिंपणगाव :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय श्रीगोंदा, राष्ट्रीय सेवा योजना, यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित 'नशा मुक्त भारत अभियान, विकसित भारत कि पहचान' या उपक्रम अंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन दि. २५ जून २०२६ रोजी महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमानिमित्त महाविद्यालयाचे प्रा. डॉ.सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी उपस्थित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना प्राचार्यांनी नशा मुक्त भारत अभियान हा भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाद्वारे सुरू करण्यात आलेला एक अत्यंत महत्त्वाचा आणि व्यापक कार्यक्रम आहे. या कार्यक्रमानिमित्त हिंदी विभाग प्रमुख प्रा. रसाळ एस.आर. यांनी अभियानाचे मुख्य उद्देश सांगितले व उपस्थितांना नशा मुक्तीची शपथ दिली. कार्यक्रमाची प्रस्तावना एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. भोस एम. एस. यांनी केले. या कार्यकम निमित्त कला शाखा प्रमुख प्रा. महारनुर बी. एन. विज्ञान शाखा प्रमुख डॉ. सूर्यवंशी एम.डी., एन.सी.सी. अधिकारी डॉ. चोरमले एस.डी. महाविद्यालयातील विद्यार्थी,पालक, शिक्षक, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शेवटी डॉ. अहिरे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.



## शेवगावात मोहरम उत्साहात शांततेत मिरवणुकीची सांगता

**अमरापूर :** शेवगाव शहरात मोहरम उत्सव धार्मिक उत्साह, पारंपरिक श्रद्धा आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. विविध भागांतून निघालेल्या ताजिया मिरवणुकांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नाईकवाडी मोहल्ला, जैन गल्ली आणि शिवाजी चौक या प्रमुख मार्गांवरून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर भगतसिंग चौक येथे धार्मिक विधीनुसार ताजियांचे विसर्जन करण्यात आले. मिरवणुकीदरम्यान सर्वधर्मीय नागरिकांनी सहभाग घेत सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचे दर्शन घडविले. यावेळी मोहरम कमिटीचे अध्यक्ष शेख जाफर जमादार (बाबा), उपाध्यक्ष शकील चाँद बेग, वसीम पठाण, मतीन अशरफ बेग, नदीम अयुब पठाण, शेख आरिफ चाँद तसेच कमिटीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते तथा वंचित बहुजन आघाडीचे शेवगाव शहराध्यक्ष प्यारेलालभाई शेख यांनीही उपस्थित राहून उत्सवात सहभाग घेतला. मोहरम मिरवणूक शांततेत आणि सुरळीत पार पडावी यासाठी शेवगाव पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. होमगार्ड पथकानेही पोलिसांना सहकार्य केले. कोणताही अनुचित प्रकार न घडता मोहरम उत्सव शांततेत व उत्साहात संपन्न झाला.

## राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त केडगावात जागर

### १११० विद्यार्थिनींना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका :** राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची जयंती व सामाजिक न्याय दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक समता, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर शाहू विचारांनी दुमदुमून गेला.

यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात भव्य जनजागृती मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थिनींनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मावळे आदींची वेशभूषा परिधान करून आकर्षक जिवंत देखावे सादर केले. राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो,सामाजिक न्याय दिनाचा विजय असो,झाडे लावा, झाडे जगवा,प्लास्टिकचा वापर टाळा,मुले-मुली एकसमान, दोघांनाही शिकवा छान तसेच स्वच्छता पाळा, रोगराई टाळा



अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन विद्यार्थिनींनी परिसरात प्रभावी जनजागृती केली.

सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या वतीने ११० गरजू विद्यार्थिनींना शालेय गणवेश, बूट व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमात विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रमेश बजाबा गवळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कायझेन अकॅडमीचे संचालक, व्याख्याते व समुपदेशक महेश डाळिंबकर उपस्थित होते.

यावेळी महेश डाळिंबकर म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य आणि विचार भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे. अध्यक्षीय भाषणात रमेश गवळी म्हणाले, दूरदृष्टी, सामाजिक समता आणि शिक्षणाचा प्रसार करणारे लोककल्याणकारी राजे म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज. समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून त्यांचे विचार समाजात रुजविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव वायळ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संजयकुमार निक्रड यांनी दिला. राजश्री पालवे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी परिचय दिला.

यावेळी भास्कर जासूद, बबन कोतकर, रावसाहेब सातपुते, प्रल्हाद साठे, जयद्रथ खाकाळ, दगडू साळवे, जयश्री कोतकर, नगरसेविका वर्षा काकडे, राजेश सोनवणे, मुख्याध्यापिका रेणुका म्हस्के, प्रा. वासंती धुमाळ देणगीदार, पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन जालिंदर सातपुते व छाया सुंबे यांनी केले. सूत्रसंचालन समृद्धी लटके व छाया सुंबे यांनी केले, तर आभार प्राचार्या वासंती धुमाळ यांनी मानले.

## ढोरजळगाव मिरी मार्गे बससेच्या फेऱ्या वाढवा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव :** शेवगाव आगारातून ढोरजळगाव-मिरी मार्गे अहिल्यानगरकडे धावणाऱ्या एस.टी. बससेवेतील अनियमिततेमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांना व शाळेतील विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार पुढे आली आहे. या पार्श्वभूमीवर ढोरजळगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंच व प्रशासक सुवर्णा देविदास गिऱ्हे यांनी शेवगाव आगार व्यवस्थापकांना निवेदन दिले. बससेवा नियमित सुरू करण्याची मागणी केली आहे.





निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव-अहिल्यानगर मार्गावरील ढोरजळगाव-मिरी या मार्गावर नियोजित वेळेत अत्यंत कमी बसगाड्या सोडल्या जातात. या मार्गावरील ढोरजळगाव, पांढरीपूल व परिसरातील अनेक गावांतील नागरिक, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्ग एस.टी. सेवेवर अवलंबून आहेत. मात्र बससेवा नियमित नसल्याने प्रवाशांना तासनतास बसस्थानकांवर प्रतिक्षा करावी लागत आहे.

ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांकडे स्वतःची वाहने नसल्यामुळे त्यांचा संपूर्ण प्रवास एस.टी. बसवरच अवलंबून आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. परिवहन विभागाने नफ्या-तोट्याचा विचार न करता ग्रामीण जनतेच्या सोयीसाठी बससेवा नियमित ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या मार्गावर प्रवाशांची संख्या समाधानकारक आहे. त्यामेळे बससेवा कमी करू नये. आगार प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन बसगाड्या सुरू कराव्यात, अन्यथा ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांच्यावतीने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# भालगाव स्मशानभूमीवर अतिक्रमणाचा आरोप

### शासकीय नोंदीतील स्मशानभूमीची तीन वेळा मोजणी रखडली; उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार :** मौजे भालगाव येथील गट क्रमांक ३१६ व सर्वे क्रमांक ५४/४ मधील दलित समाजाच्या स्मशानभूमीची मोजणी सलग तीन वेळा नियोजित होऊनही पूर्ण होऊ शकली नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अतिक्रमणधारकांकडून अडथळे निर्माण करून मोजणी प्रक्रिया रोखली जात असल्याचा आरोप करत संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दि. १६ जून २०२६ रोजी स्मशानभूमी अभिलेख विभागाकडून मोजणीसाठी अधिकारी आले असता पोलीस संरक्षणही घेण्यात आले होते. मात्र यावेळी काही व्यक्तींनी अरेरावीची भाषा वापरत मोजणी प्रक्रियेत अडथळे निर्माण केले. तसेच संबंधितांनी धमकी देऊन मोजणी होऊ देणार नसल्याची भूमिका घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर जमीन ही १९१७ पासून अस्तित्वात असून तिची अधिकृत नोंद उपलब्ध आहे. पूर्वी ७/१२ उताऱ्यावर महारांचा स्मशानवाटा असा उल्लेख होता,



तर सध्या स्मशानभूमी महाराष्ट्र शासन अशी नोंद असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

असे असताना शासनाच्या नोंदीनुसार मोजणी का केली जात नाही, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. या प्रकरणात काही व्यक्तींकडून मोरे व चव्हाण कुटुंबीयांना धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, एका महिन्याच्या आत स्मशानभूमीची मोजणी करून अतिक्रमण हटवून जागा ताब्यात देण्यात आली नाही तर मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, महसूल मंत्री, जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात येईल. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी ग्रामसेवक भाऊसाहेब राठोड, सरपंच पोपट रोकडे यांनी मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्याबत अधिकाऱ्यांना विनंती केली. तसेच भूमी अभिलेख विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मोजणी करण्याची मागणी करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मोजणीच्या वेळी ग्रामसेवक भाऊसाहेब राठोड, सरपंच पोपट रोकडे, ग्रामपंचायत कर्मचारी, उद्देश मोरे, संजय मोरे, नारायण मोरे, सुरेश चव्हाण, महेंद्र चव्हाण, विनोद चव्हाण, रमेश चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# पोषण आहार चोरीप्रकरणी गावातीलच दोघे जेरबंद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले** : तालुक्यातील दुर्गम पेढेवाडी येथील प्राथमिक शाळा व अंगणवाडीतील पोषण आहार आणि गॅस टाक्या शेगडी चोरीला गेल्याची फिर्याद ११ जून २०२६ रोजी अकोले पोलिसांत दाखल होती. या चोरीचा छडा अकोले पोलीसांनी लावला असून १ लाख १५ हजाराच्या मुद्देमालासह पेढेवाडी गावातीलच दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. पेढेवाडीत पोषण आहार चोरीस गेल्याची घटना १५ दिवसांपूर्वी घडली, गुप्त माहितीच्या आधारावर पोलिसांनी पेढेवाडीतील मारूती रावजी कुलाळ (वय ३१), काळू चिंधू कुलाळ (वय ३५) या दोघांना ताब्यात घेतले.त्यांच्याकडून भारत गॅसच्या दोन, एचपीची एक, अश्या तीन गॅस टाक्या, दिडशे किलो तांदूळ, गहू, मुगडाळ, साखर, तेल, मसूर, तेल मसाले व हिरो होन्डा मोटरसायकल असा १ लाख १५ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. अधिक तपास पोलीस निरीक्षक संदीप कोळी, पोलिस उपनिरीक्षक विनोद खांडबहाले हे करत आहे.

# बांधकाम कामगार कार्यालयावर आयुक्तालयाच्या पथकाची धाड!

## बोगस कामगार नोंदणीची तक्रार : दुचाकीच्या डिक्कीत सापडले इंजिनिअरचे बनावट रबरी शिक्के आणि बोगस दस्तावेज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : येथील इमारत व इतर बांधकाम कामगार कार्यालयावर कामगार आयुक्तलयाच्या विशेष पथकाने गुरुवारी सकाळपासून अचानक धाड सत्र सुरू केले. या धडक कारवाईत कार्यालयाच्या बाहेर उभ्या असलेल्या एका कर्मचाऱ्याच्या दुचाकीच्या डिक्कीतून 'इंजिनिअर'चे बनावट रबरी शिक्के, बोगस दस्तावेज आणि नोंदणीसाठी आणलेले कोरे व इतर व्यक्तींचे भरलेले फॉर्म जप्त करण्यात आले आहेत.

या धक्कादायक प्रकारामुळे श्रीरामपूर परिसरात आणि संबंधित प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयुक्तलयाच्या विशेष पथकाने गुरुवारी सकाळी कार्यालयात प्रवेश करत तपासणी सुरू केली. सुरुवातीला कार्यालयाच्या आतमध्ये पथकाला संशयास्पद काहीही आढळले नाही. मात्र, संशयावरून कार्यालयाबाहेर पार्क केलेल्या एका कर्मचाऱ्याच्या दुचाकीची (डिक्की) झडती घेतली असता, पथकाचे डोळेच पांढरे झाले.

त्या डिक्कीत शासकीय कामासाठी वापरले जाणारे इंजिनिअरचे बनावट रबरी शिक्के आणि काही अत्यंत महत्त्वाचे बोगस दस्तावेज मिळून आले. पथकाने हे सर्व साहित्य तात्काळ जप्त केले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे. या कार्यालयामध्ये कामगार नोंदणी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वसामान्य कामगारांकडून मोठ्या प्रमाणावर पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक माटा यांनी केला होता. या भ्रष्टाचाराविरोधात माटा हे गेल्या मार्च महिन्यापासून कामगार आयुक्तलयाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून पुराव्यांसह कारवाईची मागणी करत होते. त्यांच्या या सातत्यपूर्ण तक्रारीची गंभीर दखल घेत आयुक्तलयाच्या पथकाने अखेर ही अचानक धाड टाकली. या प्रकरणातील एक अत्यंत रंजक आणि धक्कादायक बाब म्हणजे, या कार्यालयात जे कर्मचारी कंत्राटी पद्धतीवर कामाला होते, ते सर्व एकाच गावातील रहिवासी आहेत.

त्यातील एक कर्मचारी तक्रारदाराच्या कचाट्यात अडकल्याने कंपनीने त्याला कामावरून काढून टाकले होते. त्यामुळे त्या निलंबित कर्मचाऱ्यानेच स्वतःला वाचवण्यासाठी आणि इतरांना अडकवण्यासाठी थेट तक्रारदाराच्या मदतीने हा सारा 'उद्योग' घडवून आणल्याची उलट-सुलट चर्चा सध्या श्रीरामपूर तालुक्यातील एका विशिष्ट गावात रंगली आहे.

### 'सीसीटीव्ही फुटेज'च पळवले?

संबंधित संशयित कर्मचाऱ्याबाबत आधीच अनेक तक्रारी येत असल्याने, कंपनीने त्याला काही दिवसांपूर्वीच कामावरून काढून टाकले होते, अशी माहिती समोर आली आहे. मात्र, कामावरून काढल्यानंतर आपले काळे कारनामे त्यांचे व इतरांना त्रास देण्यासाठी निश्चित तेथील पुरावे घेऊन गेला, म्हणून या कर्मचाऱ्याने थेट कार्यालयातील 'सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज' (डीव्हीआर) काढून नेल्याची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे.

कार्यालयात सर्वसामान्यांची लूट आणि मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याचे या कारवाईवरून आता सिद्ध झाले आहे. बोगस रॅकेट चालवून गरिबांची फसवणूक करणाऱ्या मुख्य सूत्रधारांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे.

**विवेक माटा (तक्रारदार)**

### वरिष्ठांच्या आशिर्वादाने 'कमिशनचा सुळसुळाट'

कार्यालयातील काही वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे थेट लागेबांधे असल्यामुळेच हा बोगस कारभार इतके दिवस बिनदिक्कत सुरू होता, असा संशय व्यक्त केला जात आहे. कामावरून काढल्यानंतरही तो कर्मचारी बाहेर राहून कमिशन तत्त्वावर काम करत होता. बनावट शिक्क्यांचा वापर करून बोगस नोंदी करण्याचे एक मोठे रॅकेटच येथे सक्रिय असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर येत आहे. या संपूर्ण प्रकरणाची आता सखोल चौकशी सुरू असून, यामध्ये आणखी कोणत्या मोठ्या अधिकाऱ्यांचे हात गुंतले आहेत? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# श्रीरामपुरात संघटित गुन्हेगारीविरुद्ध पोलिसांचा मोठा प्रहार!

## कुप्रसिद्ध साईनाथ जाधव टोळीवर नव्या कायद्यानुसार वाढीव कलमे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहर आणि परिसरात दहशत माजवणाऱ्या संघटित गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध पोलिसांनी आता थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला आहे.शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यात, वरिष्ठ पोलीस प्रशासनाने नियमावली लागू केल्यानतर भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम १११ (संघटित गुन्हेगारी) हे वाढीव कलम लावण्यात आले आहेत. टोळीप्रमुख साईनाथ शिवकुमार जाधव आणि त्याच्या साथीदारांवर ही कठोर कारवाई करण्यात आल्याने गुन्हेगारी जगतात खळबळ उडाली आहे.

यात कारवाईत जीवघेण्या हल्ल्याची पार्श्वभूमी असलेल्या (दि.१९) जून २०२६ रोजी रात्री ८:०० वाजेच्या सुमारास, फिर्यादी आणि त्यांचा नातू हितेश ब्राम्हणे हे दत्तनगर जवळील दत्त मंदिरापाशी असलेल्या गिरणीवर दळण दळण्यासाठी गेले होते.यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपी साईनाथ जाधव व त्याच्या साथीदारांनी हितेशला गाठले. हा आमच्यासोबत राहत नाही या कारणावरून त्याला शिवीगाळ करत, जीवे मारण्याच्या उद्देशाने कत्ती, चाकू, लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी गंभीर मारहाण केली. या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५९३/२०२६ अन्वये खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणी साईनाथ शिवकुमार जाधव (वय २१, रा. दत्तनगर, श्रीरामपूर),टोळी प्रमुख राहुल उर्फ चिमण्या भीमराज बागुल (वय २२, रा. दत्तनगर, श्रीरामपूर), सुजित संजय कोळगे (वय १९, रा. दत्तनगर, श्रीरामपूर), रितेश बाबासाहेब आढाव (वय २०, रा. दत्तनगर, श्रीरामपूर),धनराज सुनील जाधव (रा. दत्तनगर) या फरार आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

यातील सर्व आरोपीना अटक करण्यात आली आहेत.

### आरोपींचा गुन्हेगारी इतिहास

या टोळीतील सदस्यांनी स्वतःच्या आर्थिक व भौतिक फायद्यासाठी संघटित टोळी बनवून शहरात मोठी दहशत निर्माण केली. पोलीस रेकॉर्डनुसार, या टोळीवर खालीलप्रमाणे गंभीर गुन्हे दाखल आहेत त्यावर एकूण गुन्हे ०८ गंभीर गुन्हे, गुन्ह्यांचे स्वरूपाचे गुन्ह्यामध्ये घातक शस्त्रांसह खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी, बेकायदेशीर जमाव जमवून मारहाण करणे आणि अवैध हत्यारे बाळगणे असे गुन्हे अन्य पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

### पोलिसांचा कडक इशारा

नव्या कायद्यातील (BNS) संघटित गुन्हेगारीविरोधातील 'कलम १११' अंतर्गत कारवाई झाल्यामुळे या टोळीचा जामीन मिळणे आता कठीण होणार आहे. शहरातील शांतता आणि सुव्यवस्था भंग करणाऱ्या कोणत्याही टोळीची गय केली जाणार नाही, असा कडक इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. फरार आरोपी धनराज जाधव याच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.अशी माहिती अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी दिली.

# मेंढपाळ पती-पत्नीला मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राहुरी येथून मेंढ्यांची पिल्ले विकून परतणाऱ्या मेंढपाळ पती-पत्नीला रस्त्यात अडवून लोखंडी गजाने मारहाण केल्याची घटना श्रीरामपूर तालुक्यातील सराला शिवारात घडली. मेंढ्या चारण्याच्या जुन्या वादातून हा हल्ला झाल्याचे समोर आले असून, याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंद लक्ष्मण तमनर (रा. गडदे आखाडा, ता. राहुरी) हे सध्या मेंढ्यांसह सराला शिवारात वास्तव्यास आहेत. काही दिवसांपूर्वी मेंढ्या चारण्याच्या कारणावरून त्यांचा मच्छिंद्र लहानू थोरात याच्याशी वाद झाला होता. गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास गोविंद तमनर व त्यांची पत्नी स्वाती हे राहुरीहून मोटारसायकलने सराल्याकडे परतत असताना आरोपी मच्छिंद्र थोरात व त्याचे दोन अनोळखी साथीदार यांनी त्यांना रस्त्यात अडविले. आरोपीने चालत्या मोटारसायकलला लाथ मारल्याने दोघे खाली पडले. त्यानंतर तुला जिवंत सोडत नाही, अशी धमकी देत लोखंडी गजाने गोविंद तमनर यांच्या डोक्यात वार करून गंभीर मारहाण केली. पत्नी स्वाती यांनी आरडाओरडा केल्यानंतर नागरिक घटनास्थळी धावून आल्याने आरोपी तेथून पसार झाले. या प्रकरणी गोविंद तमनर यांच्या फिर्यादीवरून मच्छिंद्र लहानू थोरात व त्याच्या दोन अनोळखी साथीदारांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

# सेतू कार्यालयातील रिटर्न बॅलन्सच्या वादातून महिलेला रस्त्यात मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर गावठाण परिसरात सेतू कार्यालयातील रिटर्न बॅलन्सच्या वादातून एका महिलेला रस्त्यात अडवून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करत आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्चना विजयकुमार धनवटे (वय ३२, रा. जोगेश्वरी आखाडा, ता. राहुरी) यांनी राहुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, त्या सुमारे सहा महिन्यांपूर्वी विठ्ठल ढगे यांच्या राहुरी येथील सेतू कार्यालयात काम करत होत्या. दि. २५ जून २०२६ रोजी रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास अर्चना धनवटे या दुचाकीवरून बारागाव नांदूर येथून राहुरीकडे येत असताना गावठाण परिसरात आरोपी विठ्ठल बाबुराव ढगे (रा. कॉलेज रोड, राहुरी) याने त्यांना अडविले. सेतू मालकाच्या कार्डवरील रिटर्न बॅलन्स आल्याच्या कारणावरून त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर अर्चना धनवटे यांनी राहुरी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार आरोपी विठ्ठल बाबुराव ढगे याच्याविरुद्ध अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक गणेश सानप करीत आहेत.

# अवैध गर्भलिंग निदान व गर्भपात रॅकेट

## शिरूरमधून एका डॉक्टरला अटक, आरोपींची संख्या २४ वर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान चाचण्या आणि अवैध गर्भपात करणाऱ्या एका मोठ्या रॅकेटचा पोलीस प्रशासनाने पर्दाफाश केला असून, या गुन्ह्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पोलिसांच्या बारकाईने सुरू असलेल्या तपासात काल (गुरुवारी) पुणे जिल्ह्यातील शिरूर येथून आणखी एका डॉक्टरला अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे वैद्यकीय क्षेत्रात प्रचंड खळबळ माजली आहे.

डॉ. ज्ञानेश्वर नायकोडी (वय ५४, बीएएमएस, रा. शिरूर, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या डॉक्टरचे नाव आहे. या रॅकेटमध्ये थेट सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या आहेत. शुक्रवारी त्यांना राहाता न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपी डॉक्टर यास ८ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या कोठडीदरम्यान, त्यांच्याकडे कोणते एजंट गर्भवती महिलांना पाठवत होते आणि आतापर्यंत त्यांनी किती महिलांच्या चाचण्या किंवा गर्भपात केले, याचा कसून तपास केला जाणार आहे.

विशेष म्हणजे गुन्ह्यांची व्याप्ती वाढतच चालली आहे. त्या अनुषंगाने व तांत्रिक तपासाच्या आधारे या रॅकेटचे जाळे वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये आणि तालुक्यांमध्ये पसरल्याचे समोर आले आहेत. यामध्ये अनेक नामांकित डॉक्टर, मेडिकल चालक आणि एजंट सक्रिय आहेत. यात एकूण अटक २४ आरोपीना अटक केली असून डॉक्टर ०८, मेडिकल चालक ०३ वैद्यकीय साहित्य पुरवठादार ०१ (मोठा पुरवठादार) असे आरोपी गजाआड केले. त्यांच्याकडून जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तपासादरम्यान, पोलिसांनी वेगवेगळ्या जिल्ह्यांतून आणि आरोपींकडून अवैध गर्भलिंग निदानासाठी वापरल्या जाणाऱ्या ६ सोनोग्राफी मशीन जप्त केल्या आहेत. याशिवाय गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या ४ चारचाकी गाड्या आणि १ दुचाकी देखील पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत.

या कारवाई कामी अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या सुचनेनूसार सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांचे पथक अतिशय तांत्रिक आणि बारकाईने करत आहेत. या प्रकरणात आगामी काळात आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवली जात आहेत.

# फेसबुक पोस्टचा राग; तरुणाला मारहाण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : घराशेजारील शेणाचा उकिरडा हटविण्यासाठी त्याचे फोटो काढून फेसबुक व इन्स्टाग्रामवर पोस्ट केल्याच्या कारणावरून एका तरुणाला मारहाण करण्यात आली. भांडण सोडविण्यास गेलेल्या महिलेचा विनयभंग करून तलवारीने जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर येथे २४ जून रोजी रात्री घडली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादीने घराशेजारील शेणाचा उकिरडा हटविण्याच्या उद्देशाने त्याचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट केले होते. त्याची दखल घेत ग्रामपंचायतीने उकिरडा हटविल्यानंतर फिर्यादीने ग्रामपंचायतीचे आभार मानणारी आणखी एक पोस्ट केली. याचाच राग मनात धरून आरोपींनी फिर्यादी दाम्पत्याला शिवीगाळ व दमदाटी करत पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, वाद सोडविण्यासाठी मध्ये पडलेल्या एका महिलेचा हात ओढून तिचा ड्रेस ओढत विनयभंग करण्यात आला. तसेच सोशल मीडियावर बदनामी करण्याची व हातातील तलवारीने ठार मारण्याची धमकीही आरोपींनी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शेहबाज रज्जाक सय्यद, इम्रान नबी देशमुख, अरफान रज्जाक सय्यद व रिजवान नबी देशमुख (सर्व रा. बारागाव नांदूर, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक गणेश सानप पुढील तपास करीत आहेत.

# सुरत-हैद्राबाद ग्रीनफिल्ड च्या भूमापनास शेतकऱ्यांचा विरोध | आधी मोबदला जाहीर करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : एन.एच.ए.आय. अर्थात नॅशनल हायवे अथॉरिटी ऑफ इंडिया कडून आलेल्या मोजणीदार अधिकारी, कर्मचारी यांना राहुरी तालुक्यातील खडांबे आणि सडे येथील शेतकऱ्यांनी शेत-शिवारात आले असता प्रकल्पग्रस्तांनी तात्काळ ही मोजणी थांबवली व अधिकाऱ्यांना मोजणी करण्यापासून कडाडून विरोध केला. मोजणीदार पथक शेतात आले असताना या ठिकाणी पाऊस झाल्याने सर्वत्र चिखल झाला आहे.तसेच संबंधित खाजगी संस्थेने प्रकल्पातील सीमांकनही केले नसल्याचा आरोप केला आहे.



तसेच संबंधित अर्जदार व प्रकल्पग्रस्तांच्या ज्या समस्या आहेत त्याचे निवारण ही केलेले नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचे नुकसानीचा मोबदला व अन्य समस्यांचे निराकरण झाल्याशिवाय सीमांकन करू देणार नाही. असा आक्रमक पवित्रा राहुरी तालुक्यातील खडांबे, सडे येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची घेतला असून एकजुट कायम असल्याने संबंधित मोजणीदार पथक हात हलवत परतले असल्याचे चित्र दिसून आले. राहुरी तालुक्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून मोबदल्याच्या प्रश्नामुळे विरोध कायम असल्याचे चित्र दिसत आहे .भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एन. एच.ए.आय.) ने सुरत - चेन्नई या ग्रीनफिल्ड एक्सप्रेस ची सूचना २०१३ मध्ये जारी केली होती.

त्यानंतर मोठा कालखंड होत विषय रखडला गेला या महामार्गावरील जमिनीवर एन.एच.ए. आय. चा बोजा पडल्याने शेतकरी हैराण झालेले असताना मोबदला जाहीर न झाल्यामुळे शेतकऱ्यांचा विरोध कायम असून जमिनीचा कोणताही व्यवहार खरेदी अथवा विक्री देखील होत नाहीय. म्हणून एन.एच.ए. आय. च्या अधिकाऱ्यांसमोर राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द, बुद्रुक, सडे, वांबोरी येथील शेतकऱ्यांचा केंद्रशासनाच्या विरोधात प्रचंड जनआक्रोशाला सामोरे जावे लागले. असे असताना केंद्र सरकारने या सुरत-चेन्नई एक्सप्रेसवे करिता १९ हजार कोटी रुपयांची मंजुरी दिली. त्यानंतर हालचाली वेगाने वाढत नुकत्याच नाशिक - चेन्नई एक्सप्रेस हायवे मधील नाशिक ते अक्कलकोट या टप्प्याचे निविदा मागवण्यात आल्याचे सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले.

हा ग्रीनफिल्ड एक्सप्रेस हायवे नाशिक ते अहिल्यानगर पहिला टप्पा आणि अहिल्यानगर ते अक्कलकोट अशा दोन टप्प्यात २७४ किलोमीटर कामाच्या निविदा मागवण्यात आल्याचे प्रसिद्ध झाले. दोन टप्प्यासाठी दोन स्वतंत्र निविदा या एप्रिलमध्ये मंजूर प्रक्रिया झाली , भूसंपादनाचा मार्ग मोकळा होत आहे.

मात्र राहुरीतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा मोबदला जाहीर न झाल्याने विरोध कायम आहे. नाशिक - अक्कलकोट एक्सप्रेस हायवे झाल्यानंतर दहा तासांचा प्रवास अवघ्या चार तासांवर येणार आहे. सध्या नगर मनमाड राष्ट्रीय महामार्गावर प्रचंड वाहतुकीचा ताण पडत असून २०२७ च्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर अनेक ठिकाणी केंद्र सरकारकडून महामार्ग व रेल्वे मार्ग यांच्या विकास कामांचा धडाका सुरू आहे.

शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच सुरत हैदराबाद या राष्ट्रीय ग्रीनफिल्ड महामार्गाची सविस्तर,लिखीत स्वरुपात माहिती द्यावी, गाई गोठा, विहिरी,कूपनलिका,आणि घरे तसेच जमिनीचा मोबदला थेट वाटाघाटीने देण्यात यावा अन्यथा लोकशाहीच्या मार्गाने कडाडून विरोध करून जमिन मोजणी प्रक्रियेचे काम करू दिले जाणार नाही. कारण यापूर्वी मुळा ,जायकवाडी धरण, कृषी विद्यापीठ, डिझेल पाईप लाईन, आदी. प्रकल्पात माझे यापूर्वी भूसंपादन झालेले आहे.

**सागर धोंडे, प्रकल्पबाधित शेतकरी, सडे**